POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२९६ ● मुंबई, शुक्रवार, २९ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

विदर्भातील 6 जिल्ह्यांना उष्णतेचा 'रेड अलर्ट'

ब्रह्मपुरीत पारा 47 अंशांवर!

विदर्भात सूर्य ओकतोय आग, जाणून घ्या तुमच्या जिल्ह्यातील हवामानाचा अंदाज

6 जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा रेड अलर्ट

कालही विदर्भातील या 6 जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा रेड अलर्ट हवामान विभागाकडून देण्यात आला होता. गेले काही दिवस विदर्भात अतिउच्च तापमानाची नोंद होत आहे. जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 45 ते 46 अंशांच्या घरात नोंदवला जात आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी मध्ये तर कमाल तापमान 46 ते 47 अंशांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे हवामान विभागाने जारी केलेल्या रेड अलर्ट पाहता आजही विदर्भात कमाल तापमान 45 अंशांच्या जवळपास राहण्याची शक्यता आहे.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यातील काही भागात उष्णतेचा पारा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, हवामान विभागाने विदर्भात उष्णतेचा रेड अलर्ट जारी केला आहे. हवामान विभागाने आज विदर्भातील नागपूर सह वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि वाशिम या 6 जिल्ह्यासाठी उष्णतेचा रेड अलर्ट जारी केला आहे. आजसाठी विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ आणि भंडारा या 4 जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर फक्त बुलढाणा जिल्ह्यामध्ये आज उष्णतेची लाट राहणार नाही असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

गेल्या 2 दिवसांमध्ये १० जणांचा मृत्यू

सध्या नागपूरसह संपूर्ण विदर्भात उष्णतेचा कहर पाहायला मिळत आहे. 25 मे पासून सुरू झालेल्या नऊ तपात तर कमाल तापमान 45 अंशांच्या खाली यायला तयार नाही. अशात गेल्या दोन दिवसांमध्ये १० जणांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. उष्णतेमुळे उष्माघात होऊन हे मृत्यू झाल्याचा संशय आहे. आरोग्य विभागाने किंवा प्रशासनानं हे मृत्यू उष्माघातानेच झाले असावेत असा दुजोरा दिलेला नाही.

उष्णतेच्या तीव्र सर्वाधिक फटका भिक्षेकरी आणि बेघरांना

उष्णतेच्या तीव्र सर्वाधिक फटका भिक्षेकरी आणि बेघर असलेल्यांना बसत आहे. रेल्वे स्थानक आणि जवळपासच्या परिसरात 5 जणांचा मृत्यू झाला असून उष्माघाताचा संशय आहे. मृतांमध्ये बाहेरगावातून आलेले तीन प्रवासी आणि दोन अज्ञात व्यक्तींचा मृतांमध्ये समावेश आहे. रेल्वेतून प्रवास करत नागपुरात पोहोचलेल्या तीनही प्रवाशांची स्थिती प्रवासाच्या दरम्यान खालवली होती. तर शहरातील विविध भागांत आणखी 5 जणांचा मृत्यू झाला आहे. या 5 जणांचे मृतदेह सक्करदरा, ताजबाग, लकडगंज आणि कळमना परिसरात आढळले. अशक्तपणा, डोकेदुखी किंवा सतत घाम येणे ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या, व जवळच्या आरोग्यकेंद्रास भेट द्या.

काय करावं ?

- पुरेसे पाणी प्या, तहान लागलेली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या.
- उन्हात काम करत असल्यास ओल्या कपड्याने डोके मान चेहरा झाकून ठेवा. सूर्यप्रकाशाचा थेट संपर्क टाळावा.
- टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी व स्थानिक उपलब्ध पाणीदार फळे आणि पाणीदार भाज्या यांचा आहारात समावेश करा.
- घर थंड ठेवण्यासाठी खिडक्यांना पडदे लावा, रात्री खिडक्या उघड्या ठेवा आणि गारव्यासाठी पंखे किंवा ओल्या कपड्यांचा वापर करा.
- हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.
- घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री, टोपीचा आणि गॉगल वापर करा.
- ओआरएस, घरी बनवलेली लस्सी, कोशिंबीर, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी किंवा ताक यांचा नियमित आहारात वापर करा.

काय करू नये ?

- दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये किंवा जास्त साखर असलेली पेये घेऊ नका, कारण त्यामुळे शरीरातील पाणी कमी होऊ शकते.
- उन्हात अतिश्रमाची किंवा शारीरिक कष्टाची कामे करणे टाळा.
- उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाणे टाळा.
- दुपारी १२ ते ३ दरम्यान घराबाहेर पडू नका. छतावर जाऊन नका किंवा वरच्या मजल्यावर थांबणे टाळा.
- गडद रंगाचे, घट्ट किंवा जाड कपडे घालणे टाळावे.
- बाहेर जाताना अनवाणी जाऊ नका; नेहमी शूज किंवा चप्पल वापरा.
- उन्हाच्या कालावधीत बंद ठिकाणी स्वयंपाक करणे टाळावे.

महाराष्ट्र सह इतर राज्यांना धोक्याचा इशारा... १००किमी प्रतिसर वेगाने येणार वादळी वारे...

महाराष्ट्र सह इतर राज्यात वादळी वारे येण्याची शक्यता हवामान विभाग खात्याने दर्शवली आहे . वाढत्या तापमानाच्या बदळा मुले वातावण अगदी विसकळीत झाले आहे त्यात आता वादळी वाऱ्याची भर पडली आहे सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये कडाक्याचं ऊन पडत आहे. पण आता वातारणात मोठे बदल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. देशातील काही राज्यांमध्ये पुढच्या काही तासांत 110 किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार आहेत. यासोबत मुसळधार पावसाचादेखील अंदाज वर्तवण्यात आला आहे. नैऋत्य मान्सून वेगाने आगेकूच करत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांना देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तराखंडसह जम्मू आणि काश्मीरमध्ये वादळ येणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. मध्य प्रदेळातही वादळ आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात 30 मे पर्यंत मुसळधार पावसाचा आणि गारपीटचा अंदाज वर्तवण्यात आल आहे. छत्तीगड राज्यात 29 आणि 30 मे या दोन दिवसांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात सध्या तरी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

नीट पेपरफुटीत अनेक डॉक्टर सीबीआयच्या रडारवर, मोठी नावं समोर?

नीट पेपरफुटीच्या प्रकरणाच्या तपासात आता लातूरमधून नवे धागेदोरे समोर येताहेत. डॉक्टर मनोज शिरुरे याच्या अटकेनंतर लातूरातील अनेक डॉक्टर तपासाच्या भोवऱ्यात सापडलेत.आपल्या मुलांना डॉक्टर बनवण्यासाठी बड्या डॉक्टरांना नीटचा पेपर विकत घेतल्याचा संशय आहे.त्यामुळे लातुरमधील अनेक मोठी नावं आता सीबीआयच्या रडारवर आहेत. नीट पेपर फुटीचा तपास सीबीआयकडून युद्धपातळीवर सुरू आहे. राज्यातील पेपरफुटीची पाळमुळं सीबीआयने उखडून काढायला सुरूवात केलीय. या प्रकरणात महाराष्ट्रातून अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या तब्बल 13 वर पोहोचलीय. डॉक्टर मनोज शिरोळे याला अटक झाल्यानंतर आता काही दिग्गज डॉक्टरांची नावं चर्चेत आल्याने वातावरण अधिकच तापलंय.सीबीआयच्या तपासात काही डॉक्टर आणि त्यांच्या कुटुंबीयांची चौकशी करण्यात येतेय. पैशांच्या जोरावर पात्रता नसताना विद्यार्थ्यांना नीटचा पेपर मिळवून देण्यात आला.मुलांना डॉक्टर बनवून टोलेजंग हॉस्पिटल्सचा वारस तयार करण्यासाठी चुकीचा मार्ग स्वीकारला गेला असा गंभीर आरोप आता पालकांकडून केला जातोय. अनेक डॉक्टरांचे शहरात टोलेजंग हॉस्पिटल आहेत. आणि तोच वारसा पुढच्या पिढीकडे सोपवण्याची इच्छा.त्यामुळे मुलांनीही डॉक्टर व्हावं आणि पुढे हेच हॉस्पिटल सांभाळावं, असा काही डॉक्टरांचा अट्टाहास होता. म्हणून त्यांनी हा पेपर विकत घेऊन आपल्या मुलाला दिल्याची माहिती समोर आलीय. मात्र हा वारसा पुढे नेण्यासाठी गुणवत्तेऐवजी शॉर्टकटचा मार्ग निवडला गेल्याची संशय तपास यंत्रणांना आहे.हा प्रश्न आता तपासाच्या केंद्रस्थानी आलाय.

बीडमधील धक्कादायक प्रकार!

अत्याचार पीडित चिमुरडीला रुग्णालयात १० तास बसवून ठेवलं...

संतापजनक घटनेमुळे आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

नात्याला कलंक! नराधम चुलत मामे भावाकडून अल्पवयीन मुलीवर बलात्कार

मिळालेल्या माहितीनुसार, हा संतापजनक प्रकार बीडच्या केज उपजिल्हा रुग्णालयात घडला असून, यामुळे आरोग्य विभागाच्या एकूणच कार्यप्रणालीवर गंभीर प्ररनचिन्ह उपस्थित झाले आहे. एका अल्पवयीन मुलीवर तिच्याच नात्यातील चुलत मामे भावाने अत्याचार करून नात्याला कलंक फासला. बीडच्या केज पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या एका गावामध्ये मंगळवारी ही घटना घडली. नराधम भावाने पीडित चिमुरडीचे तोंड रुमालाने दाबले आणि तिचे हात दोरीने बांधून तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला. या धक्कादायक प्रसंगामुळे पीडित मुलगी प्रचंड मानसिक धक्क्यामध्ये होती.

■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्हा सध्या गुन्हेगारीच्या विळख्यात सापडला आहे. गुन्हेगारीचा हा आलेख वाढत असतानाच, आता जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा अत्यंत धक्कादायक चेहरा समोर आला आहे. बीडमध्ये एका अल्पवयीन चिमुरडीवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना घडली. मात्र, त्याहूनही भीषण आणि चीड आणणारी बाब म्हणजे, वैद्यकीय तपासणीसाठी या पीडित मुलीला उपजिल्हा रुग्णालयात तब्बल १० तास ताटकळत राहावे लागले. प्रशासनाच्या या निर्दयी कारभारामुळे संपूर्ण परिसरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

गुन्हा दाखल करायला लागली अख्खी रात्र; पोलिसांचा संथ कारभार

हा अंगावर काटा आणणारा प्रकार समोर आल्यानंतर पीडितेच्या हवालदिल झालेल्या कुटुंबियांनी तातडीने पोलीस ठाण्याकडे धाव घेतली. अधिकृत तक्रार आणि गुन्हा दाखल करण्यासाठी पीडितेसह तिचे नातेवाईक रात्री ९ वाजताच केज पोलीस स्टेशनमध्ये पोहोचले होते. मात्र, पोलिसांच्या संथ कारभारामुळे रात्री ९ वाजेपासून पीडितेचे कुटुंब तिथेच बसून होते. अखेरीस पहाटे ५ वाजता या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. म्हणजेच, गुन्हेगाराला तात्काळ अटक करण्याऐवजी पीडितेच्या कुटुंबाला अख्खी रात्र पोलीस स्टेशनमध्येच काढावी लागली.

तपासणीसाठी पीडित चिमुरडी १० तास रुग्णालयात

अगोदरच बलात्काराच्या गंभीर धक्क्यामध्ये असलेल्या चिमुरडीला आणि तिच्या कुटुंबाला पोलीस प्रशासनानंतर वैद्यकीय प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचा सामना करावा लागला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी बीडच्या केज उपजिल्हा रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयातील प्रशासनाचा ढिसाळ कारभार येथेही थांबला नाही. रुग्णालयात महिला स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करण्यात आले. या कारणास्तव पीडित मुलीला चक्क सकाळी ११ वाजेपासून रात्री ९ वाजेपर्यंत रुग्णालयातच थांबवून ठेवण्यात आले. अल्पवयीन बलात्कार पीडितेला वैद्यकीय तपासणीसारख्या संवेदनशील प्रक्रियेसाठी तब्बल १० तास हॉस्पिटलमध्ये ताटकळत ठेवल्यामुळे आरोग्य विभागाच्या क्रूरतेची परिसीमा गाठली गेली. या संदर्भात जेव्हा माध्यम प्रतिनिधी आणि नातेवाईकांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे विचारणा केली, तेव्हा "स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध नाही" आणि "कॉल डॉक्टर वेळेत उपस्थित झाले नाहीत" अशी उडवाउडवीची कारणे देण्यात आली.

आधी पोलीस स्टेशनमधील दिरंगाई आणि त्यानंतर आरोग्य विभागाचे पाषाण हृदयी कृत्य, यामुळे पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबाची प्रचंड मानसिक छळवणूक झाली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणारे पोलीस आणि जीव वाचवणारे आरोग्य विभाग, या दोन्ही यंत्रणांच्या अशा ढिसाळ आणि असंवेदनशील कारभारामुळे बीड जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणातील दोषी डॉक्टरांवर आणि बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई कधी होणार? असा सवाल आता सामान्य जनता विचारत आहे.

डिझेल नसल्याने देत गरोदर महिलेला रुग्णवाहिका नाकारली, बाळ पोटातच दगावलं

■हिंगोली। प्रतिनिधी,

हिंगोलीमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. डिझेल नसल्याचं कारण देत गरोदर महिलेला रुग्णवाहिका नाकारण्यात आली. सदर महिला रुग्णालयात पोहोचण्यास उशीर झाल्याने तिचं बाळ पोटातचं दगावल्याची माहिती समोर आली आहे. या महिलेच्या नातेवाईकांनी यासंदर्भात तक्रार केली आहे. यामुळे प्रचंड खळबळ माजली आहे. इंधन टंचाईचा फटका सर्वसामान्यांना बसल्याची भावना व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रशानाणे डीझेल नसल्याच कारण देत गरोदर मातेला रुग्ण वाहिका नाकारली होती. प्रायव्हेट वाहिकेतुन हिंगोलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल झाले, मात्र उशीरा पोचल्याने आईच्या पोटात बाळ दगावल्याची प्रतिक्रिया रुग्णांच्या नातेवाईकांनी



दिली. यामुळे एकच खळबळ माजली असून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

काय म्हणाले नातेवाईक ?

आमच्या पेशंटला रुग्णालयात हलवायचं होतं. आम्ही 850 चं डिझेल टाकून स्वतः गाडी केली आणि तिला इथे घेऊन आलो. मग हिंगोलीतल्या रुग्णालयात ॲडमिट केलं. पण तोपर्यंत उशीर झाला. कारण इथे आल्यावर आम्हाला डॉक्टर म्हणाले, ताई तुम्ही जर लौकर आला असतात तर तुमचं बाळ वाचू शकलं असतं. पण तुम्हाला (यायला) वेळ लागल्यामुळे बाळ वाचलं नाही, असं त्यांनी सांगितल्याचं, महिला रुग्णाच्या नातेवाईकांनी सांगितलं.

या मृत्यूला सरकार जबाबदार

दरम्यान या घटनेवरून विरोधकांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे. या हत्येसाठी सरकार जबाबदार आहे, असं म्हणावं लागेल. कारण कुठेही इंधन तुटवडा नाही अशा घोषणा सरकारकडून केल्या जातात, अशा वेळेस हिंगोलीमध्ये ही घटना घडली आहे. फक्त रुग्णवाहिकेला तिथे इंधन मिळालं नाही, म्हणून आज एका मातेला तिचं बाळ गमवावं लागलं , अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या रोहिणी खडसे यांनी निशाणा साधला.

व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉलमधून तरुणीचे अश्लील फुटेज?

घटनेचा छडा लावण्यासाठी पोलिसांचा 1350 किमी प्रवास...

■नाशिक। प्रतिनिधी,

हल्ली मैत्री आणि ओळखीची समीकरणं ही बहुतांशी सोशल मीडियावर आधारल्याचं पाहायला मिळतं. मात्र, याच सोशल मीडियाच्या माध्यमातून फसवणूक, नोकरीचं आमिष, आक्षेपार्ह फोटो व्हायरल करणं ही आणि अशी अनेक गुन्हेगारी कृत्यसुद्धा घडताना दिसतात. असाच एक प्रकार नाशिकमध्ये घडला. ज्याचं कनेक्शन थेट उत्तराखंडपर्यंत असल्याचं पाहायला मिळालं.

नाशिकमध्ये पुन्हा खळबळ, यावेळी काय घडलं ?

'शिया भास्कर' या नावाने बनावट इन्स्टाग्राम प्रोफाईल तयार करून संशयित आरोपी अजीम अहमद, राहणार गदरपूर, उत्तराखंड याने नाशिकच्या बागलाण मधील तरुणीशी संपर्क साधला होता. तिला नोकरीचं आमिष दाखवलं. यानंतर आरोपीने वारंवार व्हिडिओ कॉल करून तिला त्रास दिला. तरुणीने प्रतिसाद देणं बंद केल्यानंतर आरोपीने व्हिडिओ कॉलवरील स्क्रीनशॉट एडिट करून अश्लील फोटो तयार केले.

हे फोटो तिच्या होणाऱ्या पतीसह नातेवाईकांना पाठवून बदनामी करण्याची धमकी देण्यात आली. तसंच तिच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून तिची खासगी माहिती व्हायरल करण्यात आली. तरुणीची 30 हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आणि प्रकरण विकोपास गेलं.

अखेर या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल 1350 किलोमीटरचा प्रवास करून पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे, पोलीस हवालदार योगेश शेवाळे, पोलीस शिपाई कदम यांच्या पथकाने उत्तराखंडमधील गदरपूर इथं जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेतलं.

सदर कारवाईनंतर आरोपीला सटाणा इथं आणण्यात आलं. जिथं त्याच्याकडून वापरण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त करण्यासाठी आणि सखोल तपासासाठी अटक करण्यात आली. पुढील तपास सटाणा पोलीस करत असून आता त्यानं हा गुन्हा नेमका कसा आणि का केला याबाबतची माहिती समोर येईल.

नाशिकमध्ये वाढती गुन्हेगारी...

काही दिवासंपूर्वीच नाशिकमधील अशोक खरात प्रकणाचा खुलासा झाला आणि त्यानंतर मागोमाग नवनवीन खुलासे होताच एकच खळबळ माजली. खरातचे कारनामे यंत्रणांनाही धक्का देऊन गेले. मागोमागच नाशिकमधील एकका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीतील धर्मांतरण आणि लैंगिक अत्याचार प्रकरणानंसुद्धा सामान्यांना धक्का दिला. कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या या घटन पचत नाहीत तोच आता याच नाशिकमधून पुन्हा एकदा आणखी एका गुन्ह्यानं डोकं वर काढलं. एक असा गुन्हा ज्याची उकल करण्यासाठी पोलिसांनी हजारो किमीचा प्रवास केला. ही सर्व प्रकरणं पाहता एकंदरच गुन्हेगारांना कठोर शिक्षा देत कायद्याचा धाक वाढवण्याचीच गरज आहे असा सूर सामान्य जनता आळवतेय.



तरुणीशी शरीरसंबंध ठेवत बनवले अश्लील व्हिडिओ ब्लॅकमेल करत...

■मुंबई। प्रतिनिधी,

बिहारच्या मोतिहार जिल्ह्यात तरुणीशी प्रियकराने शरीरसंबंध ठेवत अश्लील व्हिडिओ बनवले. नंतर तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आला. सुगौली पोलीस ठाणे परिसरात प्रियकराला भेटण्यासाठी आलेल्या तरूणीवर अमानुष अत्याचार झाला, या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेसंदर्भात प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, तरुणी तिच्या प्रियकराला भेटण्यासाठी आली होती, त्याचदरम्यान चार जणांनी मिळून त्या तरुणीला आणि तरूणाला पकडले. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, या पुरूषांनी आधी त्या मुलीचा जबरदस्तीने अश्लील व्हिडिओ बनवला. नंतर संबंधित व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन एकामागून एक त्या महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. सामूहिक बलात्कारानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. पीडितेनं कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली, या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून सुरूवातीला दोघांना अटक केली. घडलेल्या घटनेनुसार, त्यांच्या इतर तीन साथीदारांना अटक करण्यात आली. या घटनेनंतर न्यायवैद्यक पथकाने घटनास्थळी दाखल होत पुरावे गोळा केले. अहवालानुसार, पोलिसांनी जलदगतीने खटला चालवून पीडितेला पूर्ण न्याय मिळवून देतील, असे त्यांनी म्हटले. पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी मोतिहारी रूग्णालयात पाठवण्यात आले.



एक दोन नाही तर तब्बल 140 गर्लफ्रेंड... सर्वांसोबत असं काही केलं की पोलिसही शॉक झाले

11 महिलांची पोलिस ठाण्यात लेखी तक्रार

■डोंबिवली। प्रतिनिधी,

एका तरुणाने एक दोन नाही तर तब्बल 140 तरुणींना गर्लफ्रेंड बनवले. प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तरुणींशी संबंध प्रस्थापित केले. त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या नावावर लाखो रुपयांची कर्जे काढून फसवणूक केली. या भामट्याला डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीचे नाव आदर्श म्हात्रे असे असून यापूर्वी त्याला नवी मुंबई पोलिसांनी अटक केली होती.

आदर्श म्हात्रे हा पनवेल मधील रसायनी येथील राहणारा आहे. सोशल मीडियाच्या सुरुवातीला तरुणी सोबत मैत्री करून तो त्यांचा विश्वास संपादन करायचा. त्यानंतर प्रेमसंबंध निर्माण करून संबंधित तरुणींच्या नावावर विविध बँकांमधून कर्जे काढल्याचा आरोप आहे. तपासात आतापर्यंत 140 हून अधिक तरुणींना त्याने आपल्या जाळ्यात ओढल्याची माहिती समोर आली आहे. यापैकी 11 तरुणींनी पुढे येऊन अधिकृत तक्रारी दाखल केल्या असून आणखी काही पीडित महिला तक्रार देण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

विशेष बाब म्हणजे फसवणुकीला बळी पडलेल्या अनेक महिला उच्चशिक्षित असून विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. आर्थिक क्षेत्र, कॉर्पोरेट आणि व्यावसायिक क्षेत्रातील महिलांची संख्या यामध्ये लक्षणीय असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. नवी मुंबई पोलिसांनी अटक केल्यानंतर डोंबिवलीतील एका तरुणीनेही फसवणुकीची तक्रार दिल्याने मानपाडा पोलिसांनी आदर्श म्हात्रेला ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरोधातील गुन्ह्यांचा तपास सुरू असून आणखी पीडित महिला पुढे येण्याची शक्यता असल्याने फसवणुकीचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे सोशल मीडियावरील ओळखी आणि ऑनलाइन नातेसंबंधांच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीचा गंभीर मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

सांगली-3 भोंदू बाबाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

महापुरुषांचा संचार असल्याचं सांगत शरीरिक व आर्थिक फसवणूक करणाऱ्या सांगलीच्या विटा येथील तिघा भोंदूकडुन एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.या प्रकरणी तिघांवर विटा पोलीस ठाण्यामध्ये पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.((धक्कादायक म्हणजे पीडित मुलीला,तू मागच्या जन्मी नागिन होतीस,आणि संकेतबाबा नाग होता, त्यामुळे जन्मी लग्न व्हावं म्हणून तुझा जन्म झाला असं सांगत,तिघांनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत व्हिडिओ देखील काढल्याचं पोलीस तपासात समोर आले आहे,तसेच पीडित मुलीला व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन अत्याचार केल्याचाही समोर आले आहे.))त्याचबरोबर पीडित मुलीच्या वडिलांकडून पूजा व हवन करण्यासाठी सुमारे साडेचार लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याचाही प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकरणी अटकेत असणाऱ्या भोंदू महेश मोहन बाबर, संकेत संदीप निकमआणि सूरज उपाध्ये या तिघांविरुद्ध पोक्सो अंतर्गत आणि आर्थिक फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आरोग्य आणीबाणी



पृथ्वीचे सरासरी तापमान गेल्या दशकापासून दरवर्षी नवनवे विक्रम मोडीत काढत आहे. सद्यस्थिती पाहता हा उन्हाळा आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण उन्हाळा ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात असह्य उष्ण लहरी, हिवाळ्यात अचानक येणारी थंडीची लाट आणि मान्सूनमध्ये ढगफुटीसदृश वादळी पाऊस हे आता ऋतुचक्राचे कायमचेच विस्कळीत झालेले रूप बनले आहे. हवामान बदलाचा हा मार केवळ निसर्गाच्या नोंदींपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आपल्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. मानवी आरोग्य, मुके प्राणी, शहरी वन्यजीव आणि महाराष्ट्राचे भौगोलिक भवितव्य या तापमान वाढीच्या विळख्यात पुरते होरपळून निघत आहे. ध्या देशभरात उन्हाचा पारा सातत्याने नवनवे उच्चांक गाठत असून, उत्तर भारतासह अनेक राज्यांमध्ये भीषण उष्णतेची लाट पसरली आहे. दिल्ली-एनसीआरसह अनेक शहरांमधून समोर येणारी आकडेवारी केवळ अंगाची लाहीलाही करणारी नाही, तर मानवी आरोग्यासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारी आहे. आजवर आपल्याला उन्हाळ्यातील आजार म्हणजे केवळ अस्वस्थता, घाम येणे, थकवा किंवा जास्तीत जास्त 'सनस्ट्रोक' इतकेच माहीत आहे; मात्र यंदा उन्हाळ्याने धारण केलेले रौद्ररूप आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी दिलेले इशारे पाहता, हा ऋतू आता सार्वजनिक आरोग्य आणीबाणी निर्माण करत आहे. या भीषण हवामानाचा परिणाम थेट 'मज्जासंस्था' आणि दृष्टीवर होत असल्याचे वैद्यकीय अहवालांमधून सिद्ध होत आहे. या पार्श्वभूमीवर, वाढत्या तापमानाचे मानवी शरीरावरील होणारे आघात समजून घेणे आणि त्याविरुद्ध वेळीच व्यापक पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. या बदलत्या आणि अत्यंत आक्रमक बनलेल्या उन्हाळ्याच्या आजारांचे स्वरूप पूर्वीपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. दिल्लीच्या आघाडीच्या रुग्णालयांमधील ओपीडीमध्ये केवळ उन्हामुळे आजारी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येत तब्बल २० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, या रुग्णांमध्ये ताप, जुलाब किंवा उलट्या यांसारख्या पारंपरिक लक्षणांपेक्षा 'न्यूरोलॉजिकल' संबंधित गंभीर आजारांची गुंतागुंत घेऊन येणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशातील ज्येष्ठ न्यूरोलॉजिस्टनी स्पष्ट केल्यानुसार, 'लू' आणि अतिउष्णतेचा थेट संबंध आपल्या मेंदूच्या कार्यप्रणालीशी आहे. मानवी शरीर अंतर्गत तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी एका विशिष्ट मयार्देपर्यंत संघर्ष करू शकते; परंतु जेव्हा बाहेरील तापमान सातत्याने ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या पार जाते आणि व्यक्ती प्रदीर्घ काळ या वातावरणाच्या संपर्कात राहते, तेव्हा शरीराचे हे अंतर्गत संतुलन कोलमडून पडते. अतिउष्णतेमुळे शरीराला मोठ्या प्रमाणावर घाम येतो. या घामाच्या वाटे केवळ पाणीच नाही, तर शरीरातील अत्यंत महत्त्वाचे इलेक्ट्रोलाइट्स वाहून जातात. शरीरात निर्माण होणारी ही पाण्याची तीव्र कमतरता आणि इलेक्ट्रोलाइट्सचे बिघडलेले संतुलन थेट मेंदूच्या रक्तप्रवाहावर परिणाम करते. मेंदूला होणारा रक्तपुरवठा मंदावल्यामुळे किंवा विस्कळीत झाल्यामुळे तंत्रिका तंत्रावर कमालीचा ताण येतो. याचे सद्यस्थितीत ओपीडीमध्ये दिसणारे परिणाम म्हणजे तीव्र डोकेदुखी, सतत चक्कर येणे, व्यक्तीला आजूबाजूच्या परिस्थितीचा अचानक विसर पडणे किंवा मानसिक भ्रम होणे हे आहेत. अनेक कमकुवत रुग्ण, वृद्ध आणि लहान मुले भर उन्हात किंवा पुरेशी हवा नसलेल्या ठिकाणी अचानक बेशुद्ध पडत आहेत. इतकेच नव्हे तर, अतितापमानामुळे मेंदूतील विद्युत लहरींचे नियंत्रण सुटून रुग्णांना झटके येण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. या लक्षणांकडे केवळ उन्हाळ्याचा थकवा म्हणून दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते; कारण ही न्यूरोलॉजिकल आणीबाणी असून, यामध्ये तत्काळ वैद्यकीय उपचार न मिळाल्यास रुग्णाच्या जीवाला कायमचा धोका निर्माण होऊ शकतो. या महातापमानाचा दुसरा मोठा फटका आधीपासूनच विशिष्ट आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना बसत आहे. मायग्रेन, अपस्मार किंवा नसांच्या जुन्या विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी हा उन्हाळा एका छळासारखा ठरत आहे. अतिउष्णतेचे दिवस आणि त्याहूनही अधिक त्रासदायक असणाऱ्या उष्ण रात्री यामुळे रुग्णांची झोप पूर्ण होत नाही. अनेक भागांत होणारी वीज कपात या त्रासात भर घालत आहे. अपुऱ्या झोपेमुळे आणि सततच्या शारीरिक ताणामुळे मायग्रेनच्या रुग्णांमध्ये डोकेदुखीची वारंवारता आणि तीव्रता कमालीची वाढली आहे. अपस्माराच्या रुग्णांमध्ये झटके येण्याचे प्रमाण उन्हाळ्यात वाढते, कारण त्यांचे शरीर अंतर्गत उष्णतेचा ताण सहन करू शकत नाही. मज्जासंस्थेइतकाच उन्हाचा थेट आणि मोठा मारा आपल्या नाजूक डोळ्यांवर होत आहे. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे, हवेतील उष्ण वारे, वाढती धूळ आणि प्रदूषण डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. नेत्ररोग तज्ज्ञांच्या मते, या ऋतूत 'ड्राय आय सिंड्रोम'च्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. डोळ्यांमधील पाण्याचा थर उन्हामुळे वेगाने सुकतो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ होणे, डोळे लाल होणे, सतत खाज सुटणे आणि डोळ्यांवर प्रचंड ताण येणे अशा समस्या उद्भवतात. उष्ण हवेतील धुळीच्या कणांमुळे 'ऑलर्जिक कंजंक्टिव्हायटिस' म्हणजेच डोळे येण्याची साथ पसरत आहे. या वाढत्या संकटाचा सामना करण्यासाठी आता केवळ शासकीय पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन पुरसे ठरणार नाही, तर प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक पातळीवर आरोग्याची शिस्त लावावी लागेल. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेले सल्ले आता मार्गदर्शक तत्त्वे म्हणून स्वीकारण्याची वेळ आली आहे.

सोने खरेदी नंतर... देश प्रथम



भारतीयांना सोन्याचे आकर्षण पूर्वीपासूनच आहे. पण मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सोन्याच्या खरेदीमुळे देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. त्यामुळे आता 'आधी देश, नंतर सोने' हा विचार स्वीकारून जबाबदारीने गुंतवणूक करण्याची गरज निर्माण झाली आहे.

भारतीय समाज आणि सोने हे एक आगळेवेगळे नाते आहे. अन्न, वस्त्र, निवारा इतकीच आम्हा भारतीयांसाठी सोनेदेखील जीवानवश्यक गरज आहे, असे अतिशयोक्तीने म्हटले जाते. सोने स्वस्त असो व महाग असो, सोने खरेदीचा ओघ फार पूर्वीर्पासून आपल्या देशामध्ये चालत आलेला आहे. महिलांच्या जोडीला पुरुषही ब्रेसलेट, चैन, अंगठी, हातातले कडे, कानातल्या बाळ्या यासाठी सातत्याने सोने खरेदी करत असतात. सध्या अमेरिका, इराण, इस्त्रायल असे युद्ध सुरु आहे. इंधनाच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. इंधन खरेदीसाठी परकीय चलन गरजेचे आहे. सोन्यामध्ये होत असलेली गुंततवणूक पाहता अमेरिकेकडे जात असलेले डॉलरच्या माध्यमातून परकीय चलन पाहता पंतप्रधान मोदी यांनी भारतीयांना किमान वर्षभर सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले. ही मात्रा लागू पडली.

सोने खरेदी ओघ आटला. सोने खरेदीनंतर, देश प्रथम हा ट्रेंड वेगाने विकसित होत आहे. परकीय चलन देशाबाहेर जाण्याचे ध्येय बऱ्याच अंशी साध्य झाले. भारतीय समाजात सोन्याला केवळ मौल्यवान धातू म्हणून पाहिले जात नाही, तर तो प्रतिष्ठा, सुरक्षितता, संस्कृती आणि भावनिक गुंतवणुकीचे प्रतीक मानला जातो. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक परंपरा किंवा बचतीचा पर्याय म्हणून भारतात सोन्याला विशेष महत्त्व आहे. 'सोने म्हणजे सुरक्षित भविष्य' अशी मानसिकता अनेक वर्षापासून भारतीय समाजात रुजलेली आहे. त्यामुळे देशात सोन्याची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र या वाढत्या सोन्याच्या आयातीचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता आता केंद्र सरकारकडून व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काही काळ सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केल्याची चर्चा आर्थिक आणि सामाजिक स्तरावर सुरू झाली आहे. या आवाहनामागे देशाची आर्थिक स्थिती, परकीय चलनाचा तुटवडा आणि डॉलरचा वाढता दबाव ही महत्त्वाची कारणे आहेत.

भारत हा जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या ग्राहक देशांपैकी एक मानला जातो. देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर सोने आयात केले जाते. भारतात उत्पादित होणारे सोने अत्यल्प असल्याने बहुतांश सोने परदेशातून, विशेषतः अमेरिका आणि इतर देशांतून आयात करावे लागते. या आयातीसाठी डॉलरमध्ये पैसे द्यावे लागतात. परिणामी देशातील परकीय चलनाचा मोठा साठा सोन्याच्या खरेदीसाठी खर्च होतो. याचा थेट परिणाम भारताच्या चालू खात्यातील तुटीवर आणि रुपयाच्या मूल्यावर होतो. भारतीयांना सोन्याचे आकर्षण का आहे, याची अनेक सामाजिक आणि मानसिक कारणे आहेत. ग्रामीण भागात आजही सोने हीच सर्वात सुरक्षित गुंतवणूक मानली जाते.

शेअर बाजार, म्युच्युअल फंड किंवा डिजिटल गुंतवणूक याबाबत अजूनही अनेकांना पुरेशी माहिती नाही. त्यामुळे हातात दिसणारी आणि गरजेच्या वेळी विकता येणारी मालमत्ता म्हणून सोन्याकडे पाहिले जाते. महिलांसाठी दागिने हे केवळ अलंकार नसून त्यात भावनिक आणि कौटुंबिक सुरक्षिततेची भावना जोडलेली असते. लग्नात मुलीला सोने देणे ही सामाजिक प्रतिष्ठेची बाब मानली जाते. अनेक कुटुंबे कर्ज काढूनसुद्धा सोन्याची खरेदी करतात. यामुळे 'सोन्याचे वेड' ही मानसिकता समाजात अधिक दृढ होत चालली आहे. अलीकडच्या काळात सोन्याचे दर सातत्याने वाढत असूनही खरेदीत घट झालेली दिसत नाही. उलट सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे अनेकांना ते अधिक सुरक्षित गुंतवणूक वाटू लागले आहे. आर्थिक अस्थिरता, महागाई आणि जागतिक तणावाच्या काळात लोक सोने खरेदीकडे वळतात. त्यामुळे मागणी वाढतच राहते. पण देशाच्या दृष्टीने ही स्थिती चिंताजनक आहे. कारण उत्पादनक्षम क्षेत्रात गुंतवणूक होण्याऐवजी मोठ्या प्रमाणात पैसा निष्क्रिय स्वरूपात सोन्यात अडकून राहतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते. देशातील नागरिकांनी काही काळ अनावश्यक सोन्याची खरेदी टाळली, तर देशाचा मोठा परकीय चलन खर्च वाचू शकतो. भारताला कच्चे तेल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आणि औद्योगिक उत्पादनासाठीही मोठ्या प्रमाणावर डॉलरची आवश्यकता असते.

अशा वेळी सोन्यासारख्या अनुत्पादक आयातीवर होणारा खर्च कमी झाला, तर देशाचा आर्थिक समतोल सुधारण्यास मदत होऊ शकते. सोने आयात कमी झाल्यास भारताच्या परकीय चलन साठ्यावरचा दबाव कमी होईल. डॉलरची मागणी घटल्याने रुपयाचे मूल्य स्थिर राहण्यास मदत मिळू शकते. रुपया मजबूत राहिला, तर आयात खर्च कमी होतो आणि महागाई नियंत्रणात ठेवणे सरकारसाठी तुलनेने सोपे जाते. तसेच चालू खात्यातील तूट कमी झाल्यास देशाच्या आर्थिक स्थैर्यार्ला बळ मिळते. परकीय गुंतवणूकदारांचाही भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास वाढतो.

जर नागरिकांनी सोन्याऐवजी बँक ठेवी, शेअर बाजार, म्युच्युअल फंड, सरकारी रोखे किंवा उद्योगांमध्ये गुंतवणूक केली, तर त्या पैशाचा उपयोग देशातील उत्पादन, रोजगार आणि उद्योगवाढीसाठी होऊ शकतो. अर्थव्यवस्थेत पैसा फिरत राहिल्यास विकासाला गती मिळते; परंतु मोठ्या प्रमाणावर पैसा सोन्याच्या स्वरूपात घरात किंवा लॉकरमध्ये पडून राहिला, तर त्यातून देशाच्या उत्पादन क्षमतेत कोणतीही भर पडत नाही. त्यामुळे 'मृत गुंतवणूक' अशी टीका अनेक अर्थतज्ज्ञ सोन्यावर करतात. सरकारने यापूवीर्ही गोल्ड बाँड योजना, गोल्ड मॉनेटायझेशन योजना यांसारख्या पर्यायांद्वारे नागरिकांना प्रत्यक्ष सोने खरेदी टाळण्याचे प्रयत्न केले होते. मात्र भारतीय समाजातील मानसिकता बदलणे हे मोठे आव्हान आहे. लोकांना सोन्यातील भावनिक सुरक्षितता अधिक महत्त्वाची वाटते. त्यामुळे केवळ सरकारी योजना जाहीर करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी आर्थिक साक्षरता वाढवणे, गुंतवणुकीचे पर्याय समजावून सांगणे आणि समाजात नवीन आर्थिक विचार निर्माण करणे गरजेचे आहे.

माध्यमे, बँका, शैक्षणिक संस्था आणि आर्थिक तज्ज्ञ यांनीही यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. 'जास्त सोने म्हणजे जास्त सुरक्षितता' हा समज बदलून 'उत्पादनक्षम गुंतवणूक म्हणजे आर्थिक प्रगती' ही भावना समाजात रुजवावी लागेल. विशेषतः तरुण पिढीला आधुनिक आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा नाही की, सोने पूर्णपणे वाईट आहे किंवा त्याची खरेदी थांबवावीच लागेल. भारतीय संस्कृतीत सोन्याचे स्थान कायम राहणार आहे. मात्र अतिरेक टाळणे आणि गरज व गुंतवणूक यामध्ये संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. प्रतिष्ठा दाखवण्यासाठी किंवा सामाजिक दबावामुळे होणारी अनावश्यक सोन्याची खरेदी कमी झाली, तर त्याचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होऊ शकतो. आज भारत जगातील मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी प्रत्येक नागरिकाची आर्थिक सवय देशाच्या प्रगतीशी जोडली जाते. जर नागरिकांनी विवेकाने खर्च आणि गुंतवणूक केली, तर देशाचा आर्थिक पाया अधिक मजबूत होईल. पंतप्रधानांनी केलेले आवाहन हे केवळ सोन्याबाबत नसून देशहितासाठी जबाबदार आर्थिक वर्तन करण्याचा संदेश आहे.

देशाच्या विकासासाठी सरकारच्या धोरणांसोबतच नागरिकांची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. सोन्याविषयीचे आकर्षण कायम राहू शकते, पण त्याचे अतिरेकी वेड देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी घातक ठरू शकते. त्यामुळे 'देश प्रथम' ही भावना ठेवून नागरिकांनी विचारपूर्वक निर्णय घेणे, हीच आजची खरी गरज आहे.

जामिनाचा घटनात्मक तिढा



न्यायालयाचा हा कायदेशीर पवित्रा जरी योग्य असला, तरी यामुळे एक 'घटनात्मक विरोधाभास' निर्माण झाला आहे. एकीकडे कलम २१ नुसार 'जामीन हा अधिकार' मानला गेला आहे, तर दुसरीकडे यूएपीए आणि पीएमएलए कायद्यातील तरतुदींनी या अधिकाराला वैधानिकरीत्या रोखून धरले आहे. आता न्यायालयाला या दोन्हीच्या सुवर्णमध्यावर विचार करावा लागणार आहे.

सहसा सर्वोच्च न्यायालयातील दैनंदिन कायदेशीर चर्चाकडे सर्वसामान्यांचे लक्ष कमीच असते. जेव्हा देशाला घोर संकटात लोटणारा एखादा संवेदनशील मुद्दा समोर येतो, तेव्हाच संपूर्ण देशाचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडे आणि निकालाकडे लागते. अशाच एका अत्यंत महत्त्वाच्या कायदेशीर मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच गंभीर चर्चा घडवून आणली. 'जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद' ही केवळ सहज दिलेली घोषणा नसून ती कायद्यातील वस्तुस्थिती आहे, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष न्यायालयाने काढला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे हे निरीक्षण नक्कीच विचार करायला लावणारे आहे. खटल्याच्या सुनावणीला अवाजवी विलंब झाल्यास आरोपीला जामीन दिला जाऊ शकतो का, हा मुख्य सवाल या चर्चेच्या केंद्रस्थानी होता. यावर केंद्र सरकारची भूमिका अत्यंत आक्रमक होती. अजमल कसाब आणि हाफिज सईद यांसारख्या प्रकरणांमध्ये जर सुनावणीला प्रचंड विलंब झाला असता, तर त्यांनाही जामीन देता आला असता का, असा थेट प्रश्न केंद्राने उपस्थित केला. दंगली आणि दहशतवादासारख्या गंभीर प्रकरणांमधील गुन्ह्यांचे गांभीर्य कोणत्याही परिस्थितीत नजरेआड करता येणार नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने केला.

कायद्याचे मूलभूत तत्त्व असे सांगते की, 'शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराधाला शिक्षा होता कामा नये.' मात्र, केंद्र सरकारचा युक्तिवाद असा आहे की, यूएपीए आणि पीएमएलए यांसारख्या विशेष कायद्यांतर्गत येणाऱ्या प्रकरणांकडे सामान्य गुन्ह्यांप्रमाणे पाहता येणार नाही. अशा प्रकरणांमध्ये गुन्ह्याचे गांभीर्य, आरोपीची प्रत्यक्ष भूमिका आणि कोणत्या कारणांमुळे खटला प्रलंबित राहिला, याची सखोल तपासणी करणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर विस्तृत चर्चा केली असून, आता हा तिढा सोडवण्यासाठी एका मोठ्या खंडपीठाकडे हे प्रकरण सोपवणे योग्य ठरेल, जेणेकरून सर्व बाजूंनी विचार करून अंतिम निर्णय घेता येईल.

अनेक प्रकरणांमध्ये आरोपी दीर्घकाळ तुरुंगात राहिल्यानंतर शेवटी त्याची निर्दोष मुक्तता झाल्याची उदाहरणेही घडली आहेत. दहशतवाद आणि फुटीरतावादी कृत्यांविरुद्ध संसदेने जाणीवपूर्वक कडक कायदे केले आहेत; त्यामुळे अशा गुन्ह्यांमध्ये 'बेल हा नियम' लागू होत नाही, असा एक मोठा प्रवाह आहे. येथे सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकार यांच्यातील कायदेशीर श्रेष्ठत्वाचा मुद्दाही अधोरेखित होतो. या विषयात विविध पातळीवर विरोधाभास जाणवत असल्याने, न्यायालयाने हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवण्याचा घेतलेला पवित्रा अत्यंत महत्त्वाचा आहे.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी 'जामीन हा नियम असला पाहिजे' यावर भर दिला होता, तर दुसरीकडे प्रखर दहशतवादी आणि विघातक कृत्यांमध्ये सामील असलेल्या घटकांसाठी हा नियम सरसकट लागू करता येणार नाही, असा केंद्राचा स्पष्ट युक्तिवाद आहे. न्यायालयाच्या या अंतिम निष्कर्षाचे दूरगामी परिणाम भारतीय न्यायव्यवस्थेवर होऊ शकतात. काही न्यायालयीन निवाड्यांवर गंभीर आक्षेप नोंदवले गेल्यामुळेच न्यायालयाने ही कोंडी फोडण्यासाठी हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवणे अधिक सुरक्षित आणि खात्रीचे मानले आहे.

परंतु, या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा येतो तो म्हणजे 'राष्ट्रीय सुरक्षा'. ज्या प्रकरणांमुळे देशाची सुरक्षा आणि सार्वभौमत्व धोक्यात येते, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अजमल कसाबच्या प्रकरणातही हाच मुद्दा चर्चिला गेला होता. मात्र, कसाब हा थेट देशावर हल्ला करणारा परकीय शत्रू होता, त्यामुळे त्याच्या बाबतीत या नियमाचा संबंधच येत नव्हता. देशाविरोधात युद्ध पुकारणाऱ्यांना हा नियम लागू करू नये, असे एका पक्षाचे मत आहे. जे छोटे-मोठे गुन्हेगार तुरुंगात खितपत पडले आहेत आणि ज्यांच्यापासून देशाला कोणताही मोठा धोका नाही, त्यांच्यासाठी 'बेल इज द रूल' हा नियम योग्य ठरतो. मात्र, अतिरेकी आणि राष्ट्रविरोधी कृत्यांसाठी वेगळे मापदंड लावणे गरजेचे ठरते.

सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचे नाव

संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सन्मानाने जीवन जगण्याचा मूलभूत हक्क दिला आहे. मात्र, हा नियम कसाब किंवा शारजील इमाम आणि उमर खालिद यांसारख्या आरोपींना लागू करता येणार नाही, अशी केंद्र सरकारची ठाम भूमिका आहे. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी महिन्यात उमर खालिद आणि शारजील इमाम यांना खालच्या न्यायालयाने जामीन नाकारल्याबद्दल काही गंभीर आक्षेप नोंदवले होते. सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, जामिनाचा हा उदार नियम दहशतवाद प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक केलेल्यांनाही विशिष्ट परिस्थितीत लागू होऊ शकतो. याउलट, केंद्र सरकारचा दावा आहे की, या आरोपींना हा नियम लागू होत नाही आणि म्हणूनच खालच्या न्यायालयाने त्यांना जामीन नाकारला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने खालच्या न्यायालयांना स्पष्ट जाणीव करून दिली आहे की, त्यांनी न्यायव्यवस्थेच्या रचनेकडे दुर्लक्ष करू नये. या प्रकरणातील संदिग्धता कायमची दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवले आहे. समाजाच्या सुरक्षेसाठी संसदेने जाणीवपूर्वक हे कडक कायदे बनवले आहेत, याकडेही सरकारने लक्ष वेधले आहे. या सर्व घडामोडींमुळे न्यायव्यवस्थेतच दोन तट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. वेगवेगळ्या खंडपीठांच्या परस्परविरोधी निकालांमुळे न्यायव्यवस्थेत अंतर्गत मतभेद निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. खालच्या न्यायालयाने आपल्या मयार्दा ओलांडून निर्णय घेतल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली असली, तरी यामुळे न्यायव्यवस्थेतील काही त्रुटीही समोर आल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या नवीन पवित्र्यामुळे पूर्वी दिलेले काही निकाल रद्दबातल ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे; परंतु, 'राष्ट्रहित आणि राष्ट्रीय सुरक्षा सर्वोपरी आहे' हे कोणीच विसरून चालणार नाही; त्यामुळे केंद्र सरकारची भूमिकाही तितकीच महत्त्वाची ठरते.

येवा कोकण आपलोच आसा!



खाचखळग्यातून जाणारी वाट कडेकपारी पार करत थेट सह्याद्रीच्या पायथ्याशी जाऊन मिळते, जिथे मातीचा कण न् कण धुरळा होत तांबड्या रंगात नहातो. घाटमाथ्यावरील सह्याद्री पर्वतराजीच्या हिरव्या वळणवाटा आडव्या तिडव्या रस्त्याला वाकुल्या दाखवत खेड्याकडे धाव घेतात. चाकरमान्यांना वषार्तून अनेकदा खुणावणारी कोकणातील रम्य गावखेडी शब्दात मांडणं कठीण, त्यासाठी अख्खा कोकण जगता यायला हवा. तृप्ती रस अनुभवण्यासाठी पर्यटकांची रिघ कोकणच्या समग्र सौंदर्यतेचं निशाण फडकवते. फिरण्याची जबरदस्त इच्छा असलेली मंडळी हिरव्या वळणाची कास धरतात तेव्हा कोकण त्यांना आपलसं करतो. नैसर्गिक संपदेने, जैवविविधतेने नटलेले विशाल किनारे, ताडामाडासोबत वाढलेली सुरंगीची बन, केतकीचे गंधाळ रान, पानवेली, औषधी झाडपाल्याच्या वनस्पती स्वागत करण्यास कायम सज्ज असतात. वसंतोत्सवाला तीट लावत, डोळ्यांचं पारणं फेडणारी आकर्षक रंगीत फुलांची बरसात म्हणजे सतरंगी इंद्रधनू आभास. गाभाळलेल्या मौसमातील रसरशीत चविष्ट करवंद, जांभूळ, करमलं, चिंच, बोरं सारखा रानमेवा पाहूनचं मन तृप्त होतं.

शेतातील आंबा-काजूची झाडं, दारासमोरील शेवंती, कळीमोगरा, शेवगा, फणस, निरफणस, वाफेतले अननस, लाल मिरच्या, पेरूची झाडं, केळीबागा, भातशेती, पाण्यावर पोसलेली पालेभाजी, सागाचेवृक्ष, गरम मसाले, विचित्र पक्षी, फुलंपाखरं, वन्यजीव, प्राणी, रानगवे, शिंगरू सारखे दुर्मिळ प्राणी. सागरी मत्स्य व्यवसायाला पूरक उद्योगव्यवसायाची जोड, पोहा-तांदूळ पापड, कुरडया, कोकम, आवळा आगळ्युक्त सरबत. गड, किल्ले, जलदुर्ग, नदी, नाले, पाट, धरण, बंधारे, सह्याद्रीच्या कुशीत मुरलेली वारा पावसाशी नातं सांगणारी कसदार माती, देवतांची, कुळं पुरुषाची पुरातन मंदिर, गावाबाहेरच्या वेतोबा, खेतोबासह टुमदार मंगळूरी कौलारू घरं आणि घरात राहणारी प्रेमळ माणसं इथली खासियत आहे. सर्वाथार्ने प्रसिद्ध असलेल्या कारणाने पर्यटनाच्या दृष्टीने कोकण दौरा मनःशांती देणारा ठरतो. महाराष्ट्रात विविध जिल्हे आपली वेगळी ओळख राखतात तरी कोकणातल्या सौंदयार्ची गोष्ट वेगळी आहे. कोकण म्हणजे स्वर्ग, कोकण म्हणजे देवसृष्टी. असा सुंदरतेचा मिलाप बघण्यासाठी, निसगार्शी जवळीक साधण्यासाठी कोकण तळकोकण समजून घेणं म्हणजे निसर्गाच्या भाषेला समजून घेण्यासारखं आहे. सह्याद्री पर्वतरांगेत येणाऱ्या गाव खेड्याला समजून घेताना प्रथम तिथल्या स्थानिक कोकणी माणसाचं हृदय जाणून घ्यावं लागेल.

गोमू माहेरला जाते हो नाखवा, तिच्या घोवाला कोकण दाखवा. कोकणची माणसं साधी भोळी, काळजात त्यांच्या भरली शहाळी.

शहाळ्यासारखी मऊशार आणि मधासारखी गोड माणसं कोकणची शान आहेत. शेतीमातीच्या कवितेतून कोकणासह तिथल्या माणसाच्या भव्य दिव्यतेची ओळख होते. आंबा पिकतो, रस गळतो कोकणचा राजा झिम्मा खेळतो याच गाण्यातून कोकण वासियांच्या संपन्नतेची दुसरी सुंदर बाजू दिसून येते. खडतर स्थितीत असलेल्या कुटुंबातल्या नेटक्याचं पण सुशेगाद जीवन गोडीला कायमचं बहर असतो. उत्सवात खेळले जाणारे झिम्मा, फुगड्या, दशावतार, बाल्यांचा रोमहर्षक खेळ इथल्या जीवनमानावर प्रकाश टाकतात. ज्यामध्ये संस्कृतीशी निगडीत भाषा साहित्यावर विचारांचं आदान प्रदान असतं. परंपरेशी नात सांगणाऱ्या फळाफुलांचं कौतुक असतं. कलेचा जागर असतो. विश्वात नंबर वन ओळखला जाणारा हापूस कोकणची शान असल्याने आंब्यात आंबा हापूस आंबा म्हणत जगभर त्याचा डंका वाजतो. नैसर्गिक संपत्ती, सुखसमृद्धी, सांस्कृतिक वलय आणि ढासून भरलेल्या परंपरा इथल्या सोंदर्याबरोबर आंब्याचं मधाळ, रसाळ रूप मोहिनी घालतात. आम्र खाण्याची लालसा वाढते. अभिरुची वाढून खाणारे तुटून पडतात फळावर. आंबे मोहोराचं घमघमणारं मोहळ, शेतीभाती, नारळी पोफळीच्या बागा, समुद्राची अथांगता, संपन्नतेची खाण आणि किनारपट्टीच्या वैभवात भर घालणारी तिथली साधी माणसं ही कोकणची ओळख अजूनही कायम आहे. परशुरामाचा वरदहस्त असलेल्या भूमीवर काळ्या तांबड्या आईची कृपा होते. निसर्गाच्या हाळीला ओ देत शिगमा, पालखी सोहळा, रथयात्रा, छत्रोत्सव, गौरीगणपती, दिवाळी सारखे सण हातात हात घालून नांदतात. वैशाख महिन्यात आंब्यावर मोहोराचं रान पेटतं तर वसंतात उन्हं शेकवत केशरी रंग झळाळून उठतो. कलमावर वसंत बहरतो. नव्याचं नवपणं घेऊन वृक्षाला डोहाळे लागतात. पान्हा फुटावा तशी फुलं मोहरतात, पानासंगे हिरवीगार होत कळ्या खुलतात. लगडलेल्या अवस्थेत छोट्या कैऱ्या फांद्यांवर दाटीवाटीने स्थिरावतात.

क्षुधा क्षमवणाऱ्या तृप्तीरसाची निर्मिती व्हायला अवकाश असल्याने सकस पाणसाठ्यावर झाडं पोसली जातात. तापलेल्या आमराईत गोडाची रसयात्रा भरू लागते. आयुष्यासारखचं निसगार्च देणं एकदाचं मिळतं. त्याला सार्थकी लावणं म्हणजे प्रयत्न करणं होय. मेहनतीच्या जोरावर मातेसमान असलेल्या निसर्गाच्या संवर्धन संरक्षणाची जबाबदारी सूचक भूमिकेतून निभावण्याचं काम वेळोवेळी केल्याने निसर्ग खुलतो. पशूपक्षांना आमंत्रण देतो. आमराईत उष्णता वाढू लागते. कोकिळ पंचम गाऊ लागतो. याचवेळी देवगड हापूस जन्माला येतो. सगळ्यांचा बापूस देवगड हापूसाची उत्तम वेळ म्हणजे रखरखीत असलेला एप्रिल मे महिना. हापूस आंबा म्हणजे कोकण मातीतील एक अमृताचा ठेवा ज्याच्या येण्याने कोकणात दरवळ सुटून कोकणी माणसाचा आनंद गगनात मावेनासा होतो. एकदा का देवगड हापूस चाखला की, इतर आंबे त्याच्यापुढे फिके वाटतात. त्याच्या रूपकांतीची तुलना न केलेलीच बरी. कारण नुसत्या सुवासानेचं मंतरल्यासारखं होण्याचा त्याचा गुण त्याला इतरांपेक्षा वेगळा ठेवतो. हापूसच्या कलमी झाडांना लगडलेले, हाताला लागणारे हापूस आंबे पाहाताना मिळणारा आनंद अच्युतम ठरतो. हे सुख ज्याच्या भाग्यात येतं तो त्यावेळचा राजा ठरतो. निसगार्ची मेहेरनजर ज्याच्यावर आहे तो कोकणी माणूस जगात सर्वात सुखी आहे. मौसमी आंब्या फणसाच्या गोतावळ्यात मुरलेल्या कोकणी माणसाचा पाहुणचार हा दिमाखदार म्हणावा लागेल. आंब्याक बघून ज्याचा क

करु नका 'या' चुका, नाहीतर होईल पोटातील अल्सर!

पोटातील अल्सर बद्दल तुम्ही ऐकून असालच! जगातील अतिगंभीर आजारांपैकी एक आजार म्हणून पोटाचा अल्सर ओळखला जातो. जेव्हा काही खाताना अन्न नलिकेत जळजळ होणे वा वेदना होणे या गोष्टीचे लक्षण आहे की पोटामध्ये अल्सर वाढतो आहे. हे अल्सर अन्न नलिकेत किंवा आतड्यांच्या आतील भागांत तयार होतात. या स्थितीमध्ये रूग्णासाठी ठोस आहार तर दूरच राहिला पण त्याला साधे पाणी पिताना सुद्धा त्रास होतो.

आज आपण याच आजाराबद्दल जाणून घेणार आहोत. अल्सर म्हणजे काय? ते कसे वाढतात? ते किती गंभीर असू शकतात? याचे काय काय तोटे आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या आजारावर उपाय काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला आज या लेखामधून मिळतील.

अल्सर म्हणजे काय?

अल्सर म्हणजे पोटात होणाऱ्या जखमा होय. जेव्हा हे घाव आतड्यांत किंवा अन्न नलिकेमध्ये तयार होतात तेव्हा रुग्णाला काही खाताना वा पिताना खूप वेदना होतात आणि मोठा त्रास होतो. चावलेला कोणताही पदार्थ गिळताना सुद्धा अशी जाणीव होते जसे की काहीतरी आपला गळा चिरून आतमध्ये शिरत आहे. या स्थितीत रुग्ण साधं पाणी पिताना सुद्धा घाबरतो. कारण पाणी पिताना सुद्धा खूप जळजळ आणि वेदना होतात. पोटाच्या वेगवेगळ्या भागात होणाऱ्या अल्सरच्या आजाराला वेगवेगळी नावे आहेत आणि हे अल्सर तयार होण्याची कारणे सुद्धा वेगवेगळी असतात. पोटात तयार होणाऱ्या अल्सरला गॅस्ट्रिक अल्सर आणि आतड्यांत होणऱ्या अल्सरला डुओडिनल अल्सर म्हटले जाते.

अल्सर होण्याची कारणे

सहसा शरीरात अल्सर हा शरीरातील आम्ल वाढल्यामुळे होतो. आम्ल म्हणजे एक प्रकारचे ॲसिडच असते. पोटात ॲसिड बनते आपल्या चुकीच्या आहारामुळे! जेव्हा आपण खूप काळ आहारात गरम आणि मसालेदार पदार्थ खातो तेव्हा शरीरातील आम्ल वाढत जाते. कधी कधी एखादे औषध जास्त काळ घेतल्याने सुद्धा ही स्थिती उद्भवू शकते. कारण ते औषध गरम असते. हे आम्ल आपल्या पचनतंत्राला हानी पोहचवून जखमा करते. काही धोकादायक जीवजंतू सुद्धा पोटात गेल्याने अल्सर तयार होतो.

या कारणामुळे होतो अल्सर


आतापर्यंत आपण हे जाणून घेतले की अल्सर हा सामान्यतः चुकीच्या आहार पद्धतीमुळे होतो किंवा पोटात जंतू गेल्यामुळे होतो. पण काहींची खूप धुम्रपानं करण्याची सवय, अति प्रमाणात मद्यपान किंवा खूप काळ मानसिक ताण घेऊ जगण्याची सवय सुद्धा अल्सरला कारणीभूत ठरू शकते. सध्या तरुणांमध्ये वाढत्या अल्सरच्या प्रमाणाला हीच कारणे जबाबदार असल्याचे जाणकार सांगतात. त्यामुळे या गोष्टी शक्य तितक्या टाळाव्यात आणि अल्सर पासून सुरक्षित राहावे.

अल्सर होण्याची लक्षणे काय आहेत?

एक कारण तर तुम्हाला लेखाच्या सुरुवातीलाच कळलं की अल्सर असणाऱ्या व्यक्तीला काहीही खाता पिताना खूप त्रास होतो. साधं पाणी सुद्धा पिता येत नाही. त्यामुळे हा त्रास जाणवू लागल्यास अल्सर असण्याची शक्यता वाढते. या वेदनेमुळे रुग्ण काही खाऊ शकत नाही आणि काहीच न खाल्ल्याने पोटात जास्त ॲसिड तयार होऊ लागते आणि ही समस्या अधिक वेदनादायी होते. पोटात अल्सर आल्यास वारंवार आंबट ढेकर येऊ लागतात. कधी कधी उलटी होते तर कधी कधी अचानक पोटात वेदना सुरु होतात. याशिवाय थकवा जाणवणे, चक्कर येणे यांसारख्या समस्या सुद्धा सुरु होतात.

अल्सरवर उपाय काय आहेत?

अल्सर ठीक करण्यासाठी सर्वात प्रथम म्हणजे आहारात बदल करावा लागतो. याबाबत तुम्ही अनुभवी आणि तज्ञ डॉक्टरांचाच सल्ला घ्यावा. ते तुम्हाला याबाबतीत योग्य मार्गदर्शन करू शकतील. कारण अल्सरचे प्रमाण किती आहे त्यानुसार डॉक्टर आहार ठरवून देतात. आहार तयार करताना तुम्ही कोणत्या वातावरणात राहता, आसपास स्थिती कशी आहे यासारख्या गोष्टी सुद्धा डॉक्टरांन पाहाव्या लागतात. सध्या अल्सरवर अनेक औषधे आली आहेत जी शरीरातील आम्लाचे प्रमाण कमी करतात आणि अल्सर हळूहळू ठीक होऊ लागतो. ज्यांचा अल्सर अधिक गंभीर झाला आहे त्यांच्यावर ऑपरेशन करूनच उपचार करावे लागतात.



Diabetes
मधुमेहामुळे या महत्त्वाच्या अवयवांवर होतो दुष्परिणाम

मधुमेह किंवा डायबेटिस हा बदललेल्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या विविध आजारांपैकी एक आहे. मधुमेहाच्या विळख्याने आपणा भारतीयांना अक्षरशः गिळंकृत केलेले आहे. मधुमेहाचे, टाइप-१ आणि टाइप-२ असे दोन प्रकार आहेत. टाइप-१ या प्रकारात शरीरात इन्सुलीन स्रवत नाही किंवा ते अत्यंत कमी प्रमाणात स्रवते. हे रुग्ण इन्सुलीनच्या इंजेक्शनशिवाय जगू शकत नाही. टाइप-२ या प्रकारात इन्सुलीन कमी प्रमाणात स्रवते, पण या रुग्णांमध्ये गोळ्यांमुळे मधुमेह आटोक्यात येऊ शकतो.

मधुमेहाची कारणे : आई, वडील किंवा कुटुंबातील सदस्यांना मधुमेह असेल तर मुलांना होण्याची शक्यता जास्त असते. मधुमेहाची सुरुवात साधारणपणे ४० ते ५० या वयादरम्यान होते. लठ्ठ व्यक्तींना लठ्ठपणाबरोबर ब्लडप्रेशर आणि कोलेस्ट्रॉल जास्त असेल तर त्यांना मधुमेह होण्याची शक्यता जास्त असते.

दुष्परिणाम टाळण्यासाठी उपाय

शरीरातील कोलेस्ट्रॉल आटोक्यात ठेवण्यासाठी स्निग्ध पदार्थांचे सेवन कमी करावे. गरज भासल्यास औषधे घ्यावीत. वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. त्यांनी सांगितलेल्या तपासण्या कराव्यात. हे सर्व केल्यास एकतर तुम्ही मधुमेह होण्यापासून स्वतःचा बचाव करू शकता किंवा मधुमेह झाल्यास त्याची नीट काळजी घेऊन त्यापासून होणारे वाईट परिणाम टाळू शकता.

मधुमेहाची लक्षणे

भूक जास्त लागणे, तहान जास्त लागणे, लघवी जास्त लागणे, जखम लवकर बरी न होणे, पायांमध्ये मुंग्या येणे, लघवीमध्ये जळजळ होणे, योनीमार्गाचे इन्फेक्शन होणे, थकवा वाटणे, गोड जास्त खाण्याची इच्छा होणे ही मधुमेहाची लक्षणे आहेत. काही वेळा मधुमेह हा ऑपरेशनपूर्वी करावयाच्या शुगर टेस्टमुळे समजतो. मधुमेह शरीरातील एकूण एक अवयवांवर परिणाम करतो. यात प्रामुख्याने किडनी, हृदय, रेटिना, पायातील नसा, पायाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिन्या या अवयवांवर जास्त परिणाम होतात.

रक्त शर्करचे प्रमाण किती असावे?

मधुमेहामध्ये सतत वाढलेल्या साखरेच्या प्रमाणामुळे सगळ्या महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम होऊन त्याचे विकार उद्भवतात. साधारणतः आठ ते दहा तास उपाशीपोटी राहून केली जाणारी शुगर टेस्ट म्हणजे 'फास्टिंग ब्लड शुगर'. ती ब्लड शुगर शंभरपेक्षा कमी हवी. जेवणानंतर दोन तासांनी केलेली ब्लड शुगर १४०पेक्षा कमी हवी. यापेक्षा ब्लड शुगर जास्त असेल तर मधुमेहाची शक्यता जास्त असते.

प्रतिबंधात्मक उपाय

जास्त गोड खाल्ल्याने मधुमेह होतो अशी लोकांची धारणा असते, तर तसे नाही. मधुमेह झाला तर गोड खाऊ नये हे तत्त्व आहे. सात्विक आहार घ्यावा. भूक नसल्यास खाऊ नये. जेवणातील तळलेल्या पदार्थांचे प्रमाण कमी करावे. नियमितपणे व्यायाम करावा. रोज ३०-४५ मिनिटे चालणे हा एक सहजसोपा व्यायाम आहे. हे करताना नेमकी गती पाळली पाहिजे. जवळपास जाताना पायीच जावे.



तुमचे केस फारच गळतात का, मग जाणून घ्या ही हेअरफॉलची कारणं

काळेभोर आणि लांबसडक केस सर्वांनाच हवं असतात. केस लांब व्हावेत यासाठी तुम्ही खूप प्रयत्नही करता. मात्र वारंवार केस गळण्यामुळे तुमचं लांब केसांचं स्वप्न पूर्ण होत नाही. दर तीन महिन्यांनी थोडेसे केस गळणं हे नैसर्गिक आहे. मात्र जर तुमचे केस सतत गळत असतील तर तुम्हाला त्यामागचं कारण शोधणं गरजेचं आहे. केस गळण्याची अनेक कारणं असू शकतात. यासाठी जाणून घ्या केस का गळतात.

केस गळण्याची कारणे –

केस गळत असतील तर त्यावर उपाय करण्यासाठी तुम्हाला केस गळण्यामागची कारणं माहीत असायला हवी.

हॉर्मोनल कारणे –

केस गळण्यामागे तुमच्या शरीरात होणारे हॉर्मोनल बदल महत्त्वाचे कारण असते. महिलांमध्ये गरोदरपण, मॅनोपॉज, थायरॉईड ग्रंथीची कार्यक्षमता, बाळंतपण अथवा इतर शारीरिक समस्या कारणीभूत असतात. मात्र या अवस्था पार केल्यावर अथवा आरोग्य समस्यांवर योग्य उपचार केल्यावर तुमचे केस पुन्हा पूर्ववत होतात.

फॅमिली हिस्ट्री –

केस गळण्यामागे अनुवंशिकता हे एक मोठे कारण असू शकते. काही पुरूषांना एका ठराविक कालावधीनंतर टक्कल पडतं. तुमच्या आई-वडील अथवा बहीण-भावांचे केस ज्या वयात गळू लागतात त्या वयामध्ये तुमचे केस गळण्याची दाट शक्यता असते.

ताणतणाव –

कामाचा अती ताण अथवा कौटुंबिक चिंतेमुळे तुमचे केस मोठ्या प्रमाणावर गळू शकतात. ज्या लोकांना सतत कामाच्या ठिकाणी मोठमोठ्या जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. त्यांच्या डोक्यात रात्रंदिवस कामाचाच विषय असतो. कधी कधी काही कौटुंबिक अथवा वैयक्तिक समस्यांमुळे तुम्ही सतत ताणात असता. या कारणांमुळे तुमचे केस मोठ्या प्रमाणावर गळू शकतात.

कंगवा चुकीच्या पद्धतीने वापरणे –

केस गळणं ही एक सामान्य समस्या आहे. मात्र तुम्ही जर वारंवार कंगवा केसातून फिरवत असाल तर तुमच्या केसांचं नुकसान मोठ्या प्रमाणात होतं. केस धुतल्यावर लगेच कंगवा अथवा ब्रशने जोरजोरात विंचरल्यामुळेदेखील तुमचे केस लवकर तुटू शकतात. यासाठी केस कोरडे झाल्यावर केसांमधील गुंता सावकाश सोडवा.

अती गरम पाण्याने केस धुणे –

जर तुम्हाला अती गरम पाण्याने केस धुण्याची सवय असेल तर तुमच्या केसांचे नुकसान होऊ शकते. कारण पाण्याचे तापमान जास्त असेल तर त्यामुळे तुमचे केस कोरडे आणि निस्तेज होतात. शिवाय केसांची मुळं यामुळे दुखावली जातात आणि केस मोठ्या प्रमाणावर गळू लागतात. यासाठी केस धुण्यासाठी कोमट अथवा थंड पाण्याचा वापर करा.

हेअर ड्रायर, कर्लर, स्टेटनरचा अती वापर –

काही लोकांना केस धुतल्यावर ते सुकवण्यासाठी दररोज हेअर ड्रायर वापरण्याची सवय असते. ड्रायरमुळे केस केस लवकर कोरडे होतात. नैसर्गिक पद्धतीने केस न सुकल्यास ते तुटण्याची शक्यता जास्त असते. कारण हेअर ड्रायरमुळे केसांमधील नैसर्गिक तेल निघून जातं. एखादी स्पेशल हेअरस्टाईल करण्यासाठी कधी कधी हेअर ड्रायर,स्टेटनर, कर्लर वापरण्यास काहीच हरकत नाही. मात्र नियमित ही साधने वापरण्यामुळे तुमचे केस गळू शकतात.

केमिकलयुक्त शँपूचा अती वापर-

केस धुताना दोन पेक्षा अधिक वेळा शँपू करू नका. कारण त्यामुळे तुमच्या केसांमधील नैसर्गिक तेल कमी होते. केसांना नैसर्गिक तेलाची गरज असते. ज्यामुळे केसांचे पोषण होते आणि केस चमकदार दिसतात. जर केस फार तेलकट अथवा खराब झालेले असतील तरच दोन वेळा शँपू करा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा केस धुणार असाल तर एखाद्या सौम्य शँपूचा अथवा पॅराबेन फ्री शँपूचा वापर करा.ज्यामुळे तुमचे केस फार गळणार नाहीत.

रिकाम्या पोटी लसूण खाण्याचे फायदे

सर्वसाधारणपणे लसणीचा उपयोग भाजीला फोडणी देण्यासाठी, एखाद्या भाजीची ग्रेव्ही तयार करण्यासाठी, किंवा चटण्या बनविण्यासाठी केला जातो. एखादी बेचव भाजी केवळ लसूण त्यामध्ये घातल्याने किती चविष्ट बनते ! पण केवळ खाद्यपदार्थांची चव वाढविण्याखेरीज ही लसूण अजून किती तरी प्रकारे उपयोगाला येते. लसणीमध्ये अशी अनेक गुणकारी तत्वे आहेत, ज्यामुळे आपला अनेक विकारांपासून बचाव होऊ शकतो. आयुवेर्दामध्ये लसणीला ह्य वंडर फूड ह्य म्हटले गेले असून, लसणीचा उपयोग औषधी म्हणून केला गेला आहे. त्यामुळे आपण आपल्या आहारात लसणीचा समावेश करणे अगत्याचे आहे. पण या औषधीचा सर्वात जास्त उपयोग सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी खाल्ल्याने होतो.

त्यामुळे दररोज सकाळी उठल्यानंतर एक लसणीची पाकळी चावून खावी व त्यानंतर एक ग्लास कोमट पाणी प्यावे. जर लसूण चावून खाणे शक्य नसेल, तर लसणीची पाकळी गरम पाण्याबरोबर गिळून टाकावी. लसूण हृदयरोगाशी संबंधित तक्रारी दूर करण्यास मदत करते. लसूण खाल्ल्याने रक्ताच्या गाठी बनत नाहीत. तसेच हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता ही कमी होते. लसूण आणि मध मिसळून खाल्ल्यास हृदयाच्या धमन्यांमध्ये असलेले ब्लॉकेज दूर होते, त्यामुळे हृदयाचा रक्तप्रवाह सुरळीत सुरु राहतो. लसूण खाल्ल्याने उच्चरक्तदाब असल्यास तो नियंत्रित ठेवणे शक्य होते. लसणीच्या सेवनाने शरीरातील रक्ताभिसरण चांगले राहते. डायरिया किंवा बद्धकोष्ठ या पोटाच्या दोन्ही विकारांमध्ये लसूण उपयोगी आहे. यासाठी थोडे पाणी उकळायला ठेऊन त्यामध्ये पाच-सहा लसणीच्या पाकळ्या घालाव्यात. पाणी साधारण सात-आठ मिनिटे उकळून घ्यावे. त्यांनतर हे पाणी थोडे निवले, की मग हे पाणी प्यावे. या लसणीच्या पाण्यामुळे जुलाब आणि बद्धकोष्ठ या दोन्ही विकारांमध्ये आराम मिळतो.

तसेच शरीरामधील घातक पदार्थ देखील लसणीच्या पाण्याच्या सेवनाने बाहेर टाकले जातात. तसेच लसणीच्या सेवनाने पाचनशक्ती देखील चांगली राहते. ज्यांना अपचनाचा त्रास होत असेल, किंवा ज्यांना काही कारणाने भूक कमी लागत असेल, त्यांनी सकाळी रिकम्या पोटी लसूण चावून खावी. लसणीचा सेवनाने ॲसिडीटीपासून ही आराम मिळतो.लसणीमध्ये अँटी बॅक्टेरियल व वेदना कमी करणारी तत्वे आहेत. त्यामुळे इन्फेक्शन झाल्याने जर दातदुखी सतावत असेल, तर लसणीची एक पाकळी ठेचून जो दात दुखत असेल, तिथे ठेवावी. या उपायाने दात दुखी कमी होण्यास मदत होते. श्वासनाशी संबंधित विकारांमध्ये ही लसणीच्या सेवनाने फायदा होतो. सर्दी-पडसे, खोकला, अस्थमा, निमोनिया, ब्रॉन्कायटीस, इत्यादी विकारांमध्ये लसणीचे सेवन फायदेशीर ठरते.



वजन वाढण्याचे एक कारण सलॅड ही असू शकतं !

आपल्या वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी जर आपण डायटिंग करत असाल आणि त्यासाठी सलॅडचे अधिक सेवन करत असाल तर सावध व्हा. कारण सॅलडनेही वजन वाढू शकतं. हे वाचून आपल्याला आश्चर्य वाटत असलं तरी हे खरं आहे. तशी ही गोष्ट सर्व प्रकाराच्या सलॅडवर लागू होत नाही, परंतू अनेकदा आपण स्वादिष्ट आणि चटपटीत सलॅडचा मजा घेण्याच्या फिराकीत वजन वाढवता. बाहेर जेवायला गेल्यावर आपण आपल्या आवडीचे मेयोनीज आणि क्रीमने भरपूर सलॅडची चव बघता आणि व्हेज सिझलरच्या नावावर भरपूर सॉसही सेवन करता. परंतू या प्रकाराचे सलॅड कॅलरीने भरपूर असतात आणि वजन कमी करण्याऐवजी वाढवू शकतात. याव्यतिरिक्त अनेक रेस्टॉरन्टध्ये सर्व्ह करण्यात येर्णाया सलॅडची गार्निशिंगमध्ये असे पदार्थ वापरले जातात जे कॅलरीने भरपूर असतात आणि चव देण्यासह सपाट्याने आपले वजन वाढवण्यात हातभार लावतात. म्हणून सलॅडचे सेवन करताना ते फ्रेश, आणि विना कॅलरीयुक्त असावे याची काळजी घ्या.



१. डोकेदुखी : जर तुम्हाला डोकेदुखीची समस्या असेल तर तुम्ही दररोज दोन चमचे कांद्याचा रस आणि एक चमचा साखर अर्धा कप पाण्यात मिसळून घेतल्याने तुमची डोकेदुखी थांबते.

२. पुरुषातील कमजोरी : जर पुरुषांना कमजोरी असेल किंवा त्यांना काम क्रीडा करताना अशक्तपणा जाणवत असेल तर त्यावर कांदा हा रामबाण उपाय आहे. दररोज दोन चमचे कांद्याचा रस 3 चमचे मध रोज सकाळ-संध्याकाळ त्याने पुरुषाची कमजोरी दूर होते.

३. महिलांचा मासिक पाळीचा त्रास : जर महिला आणि तरुणींना मासिक पाळीचा त्रास होत असेल तर दररोज दोन चमचे कांद्याचा रसासोबत घेतल्याने मासिक पाळीचा त्रास कमी होऊन स्त्रियांची कमजोरी कमी होऊ शकते.

४. लघवीची समस्या : जर स्त्री आणि पुरुषांना लघवीची खूप मोठी समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याचा रस 3 या सोबत घेतल्याने युरिनच्या समस्येवर फायदा होऊ शकतो. असा प्रयोग दररोज करावा.

५. कोंडा : तरुणी किंवा पुरुषांना केसांमध्ये कोंड्याची समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याचा रस अर्धा वाटी दह्यामध्ये मिसळून केसांवर लावल्याने कोंडा मोठ्या प्रमाणात दूर होतो.

६. मुतखडा: जर तुम्हाला मुतखड्या संबंधित समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याच्या रसात एक चमचा साखर मिसळून घेतल्याने तुम्हाला तातडीने मुतखड्या पासून मुक्तता मिळू शकते.

७. टकले पणा: आज-काल तरुणांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात टकलेपणाची समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या दूर करण्यासाठी दररोज दोन चमचे कांद्याचा रस दोन चमचे मध मिसळून मसाज केल्याने

केस गळती कमी होते. पर्यायाने केस गळती थांबते.

८. अपचन: आजकाल बाहेरचे खाल्ल्याने खूप मोठ्या प्रमाणात अपचनाची समस्या निर्माण झालेली आहे. त्यासाठी अपचन दूर करण्यासाठी दररोज दोन चमचे कांद्याचा रस, हिंग आणि काळे मीठ मिसळून घेतल्यास पोटातील गॅस ची समस्याही कमी होते.

९. खाज: जर तुम्हाला खाजी संबंधी काही समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याच्या रसामध्ये हळद मिसळून लावल्याने त्वचा संबंधी आजारात फायदा होतो.



दररोज दोन चमचे कांद्याचा रस घेऊन ९ समस्या वर करा मात

योगसाधनेने मिळवा सुंदर त्वचा, लांबसडक केस

भगवान योग केल्याने शरीराला अनेक फायदे होतात. त्यासोबतच त्वचा आणि केसांनाही याचा फायदा होतो. सुंदर त्वचा आणि चमकत्या केसांसाठी प्राणायम सर्वात महत्त्वपूर्ण मानलं जातं. यामुळे ताण कमी होतो. रक्तात ऑक्सिजनचं प्रमाण वाढून रक्ताभिसरण सुरळित होण्यास मदत होते. योगासनांमुळे शारीरिक, मानसिक स्वास्थ उत्तम राहतं. नाडी तंत्र सुरळित होतं. मानसिक तणावापासून मुक्ती मिळण्यास मदत होते. सौंदर्यांसाठी योग आवश्यक आहे. योगमुळे शरीराला पर्याप्त मात्रामध्ये पोषाहार प्राप्त होतो. योगमुळे त्वचेमध्ये असणारे विषारी द्रव्य बाहेर काढण्यास मदत होते. योगासनांमुळे त्वचेला ऑक्सिजन मिळण्यास मदत होते. त्वचा रोगांपासून मुक्ती मिळण्यास मदत होते. ही प्रक्रिया केसांसाठीही लागू होते. जेव्हा एखाद्याला तणाव वाटतो, त्यावेळी मस्तिष्क, रक्तात एड्रेनालाइन सोडतं. एड्रेनालाइनमुळे हृदयाचे ठोके जलद होतात. त्यामुळे ब्लड प्रेशर वाढतं. सतत तणावात राहिल्याने हृदयाशी संबंधी समस्यांचा धोका वाढतो. जे लोक अधिक तणावात राहतात, त्यांना इतरांच्या तुलनेत हृदय रोग होण्याची शक्यता अधिक असते. दररोज योग केल्यास ताण-तणावापासून दूर राहण्यास मदत होते. दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो. लोकांमध्ये योगप्रति जागरुकता निर्माण करणं हा जागतिक योग दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. यावर्षी १ ते ७ मार्च २०२० हा आठवडा योग सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे.



'अळूचं फदफदं'

© K I T C H E N

साहीत्य : ◆७ ते ८ अळूची मध्यम पाने ◆३ ते ४ टेस्पून शेंगदाणे ◆२ ते ३ टेस्पून चणा डाळ

:::फोडणीसाठी::: ◆१ टेस्पून तेल, ◆२ चिमटी मोहोरी, ◆१/८ टीस्पून हिंग, ◆१/४ टीस्पून हळद, ◆१/४ टीस्पून लाल तिखट, ◆३ टेस्पून बेसन, ◆१ टीस्पून चिंच, ◆२ टीस्पून गोडा मसाला, ◆२ टीस्पून गूळ, ◆चवीपुरते मीठ

कृती : ◆शेंगदाणे आणि चणा डाळ किमान २ तास पाण्यात भिजत घालावी. नंतर प्रेशर कुकरमध्ये १ किंवा २ शिट्ट्या करून शिजवून घ्यावे. ◆चिंच १/२ कप पाण्यात १० मिनिटे भिजत ठेवावी. नंतर चिंच कुस्करून कोळ काढून घ्यावा. ◆अळूची पाने धुवून पुसून घ्यावी. देठं वेगळी काढावीत आणि सोलून घ्यावीत. नंतर पानं बारीक चिरून घ्यावी. देठंही चिरून घ्यावीत. ◆कढईत तेल गरम करून मोहोरी, हिंग, हळद, तिखट घालून फोडणी करून घ्यावी. यात चिरलेली अळूची पाने आणि देठं घालावीत. १/२ टीस्पून मीठही घालावे. झाकण ठेवून ६ ते ७ मिनिटे शिजवावे. अळू जर कोरडा वाटत असेल तर थोडे पाणी शिंपडावे. ◆चिंचेचा कोळ घालून अजून ३-४ मिनिटे शिजू द्यावे. १/२ कप पाण्यात २ टेस्पून बेसन गुठळी न होता मिक्स करून घ्यावे.हे मिश्रण कढईत घालून ढवळावे. ◆यात शिजवलेली चणा डाळ आणि शेंगदाणे घालावे. गरजेनुसार थोडे पाणी घालावे. (भाजी पळीवाढी करावी, प्रचंड घट्टही नको आणि पातळही नको.) ◆गोडा मसाला, गूळ, आणि लागल्यास मीठ घालून मिक्स करावे. बेसन शिजेस्तोवर उकळी काढावी. ◆गरमागरम तूप भाताबरोबर किंवा भाकरीबरोबर सर्व्ह करावे.

छत्रपती संभाजीनगरात गोवंश तस्करांवर पोलिसांची धडक कारवाई

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

गोवंश तस्करी करणाऱ्या टोळ्यांविरोधात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई करत तस्करांचे कंबरडे मोडले आहे. चोरट्या मार्गाने गोवंशाची अवैध वाहतूक करणारे, बेकायदेशीर कत्तलखाने चालवणारे आणि गोमांस विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी धडक कारवाई करत मोठं जाळं उद्ध्वस्त केलं आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या आदेशानंतर संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांनी आक्रमक मोहीम उघडली असून, अनेक मोठे तस्कर भूमिगत झाल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांच्या या कठोर कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण झाली आहे.

RTO चा मोठा दणका; वाहन आणि लायसन्सवर थेट कारवाई

गोवंश तस्करी प्रकरणात केवळ गुन्हे दाखल करून पोलीस थांबले नाहीत, तर तस्करांच्या आर्थिक नाड्यांवरही थेट घाव घालण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांनी तब्बल १९ वाहनं आणि चालकांचे परवाने निलंबित करण्यासाठी आरटीओकडे प्रस्ताव पाठवला होता. त्यावर तत्काळ कारवाई करत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने ५ वाहनांचे परवाने ३० दिवसांसाठी निलंबित केले आहेत. तसेच ६ चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स थेट ९० दिवसांसाठी रद्द करण्यात आले आहेत. याशिवाय इतर जिल्ह्यांतील वाहनांवरही अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यासाठी संबंधित आरटीओ कार्यालयांकडे प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत. भविष्यात गोवंश तस्करीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांना रस्त्यावर फिरू दिले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

१० दिवसांत २४ गुन्हे दाखल; ४४ आरोपी जेरबंद

४४ आरोपींना अटक!



१६ मे ते २६ मे या अवघ्या १० दिवसांच्या कालावधीत ग्रामीण पोलिसांनी संपूर्ण जिल्ह्यात विशेष मोहीम राबवली. छुप्या मार्गांवर नाकाबंदी, रात्रीची गस्त आणि सुनियोजित छापेमारी करत पोलिसांनी गोवंश तस्करांना जेरबंद केले. वैजापूर, गंगापूर, पैठण, कन्नड, सिल्लोड, फुलंब्री आणि करमाडसह अनेक पोलीस ठाण्यांच्या विशेष पथकांनी या मोहिमेत धाडसी कामगिरी बजावली. या कारवाईदरम्यान पोलिसांनी २४ गंभीर गुन्हे दाखल केले असून तब्बल ४४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींवर महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन अधिनियमांतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

१११ जनावरांची सुटका; ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी छापेमारीदरम्यान कत्तलीसाठी अत्यंत निर्दयीपणे डांबून ठेवलेली १११ जनावरे सुखरूप मुक्त केली आहेत. यामध्ये छुप्या ठिकाणी ठेवलेली ४२ जनावरे आणि वाहनांमध्ये कोंबून नेण्यात येत असलेली ६९ जनावरे यांचा समावेश आहे. या सर्व जनावरांची किंमत तब्बल ३३ लाख ९९ हजार २०० रुपये इतकी असल्याची माहिती समोर आली आहे. मुक्त करण्यात आलेल्या जनावरांना अधिकृत गोशाळांमध्ये पाठवण्यात आले आहे. याशिवाय पोलिसांनी आरोपींकडून १ हजार ९४५ किलो गोमांस, वाहने आणि इतर साहित्य असा एकूण ५५ लाख ४६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांचं नागरिकांना आवाहन

या प्रकरणानंतर पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी नागरिकांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी कोणीही कायदा हातात घेऊ नये, असे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. गोवंशाची अवैध वाहतूक, तस्करी किंवा बेकायदेशीर कत्तल होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ स्थानिक पोलीस ठाणे, पोलीस नियंत्रण कक्ष (0240-2381633) किंवा 'डायल 112' वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल आणि गोवंश तस्करांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

जगाच्या नकाशावर या मार्केटचे नाव येणार

मुंबईतील 117 वर्ष जुन्या स्वदेशी मार्केटचा पुनर्विकास होणार

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील दक्षिण मुंबईच्या काळबादेवी परिसरात 117 वर्षे जुनं स्वदेशी मार्केट आहे. अनेक वर्षांपासून स्वदेशी मार्केटचा पुनर्विकास रखडलेला आहे. स्वदेशी मार्केटमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून कपड्यांचा व्यापार सुरू आहे. स्वदेशी मार्केटचा पुनर्विकास होणार आहे. जगाच्या नकाशावर या मार्केटचे नाव येणार आहे. स्वदेशी मार्केटच्या पुनर्विकासाबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.

मुंबईच्या या स्वदेशी मार्केटला 26 मे 2026 रोजी 117 वर्षे पूर्ण झाली आहेत. याच स्वदेशी मार्केटच्या काळबादेवी परिसरात इंग्रज सरकार विरोधात स्वदेशीचा नारा देत थोर क्रांतिकारी बाबू गेनू सैद यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. क्रांतिकारक बाबू गेनू सैद यांनी स्वातंत्र्यलढ्यात स्वदेशीसाठी बलिदान दिले. विदेशी कपड्यांच्या ट्रकला रोखण्यासाठी त्यांचे हे बलिदान आपल्याला आजही स्वदेशीसाठी प्रेरणा व दिशा देते. त्यांचा हा जाज्वल्य वारसा मुंबईच्या प्रसिद्ध कापड बाजारातील 'स्वदेशी मार्केट' ही संस्था गेल्या 117 वर्षांपासून अभिमानाने जपत आहे.

स्वदेशी मार्केटच्या ऐतिहासिक स्थापना दिवसाचे औचित्य साधत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त गेल्या 117 वर्षांमधील संस्थेचा गौरवशाली प्रवास उलगडणाऱ्या पोस्टल एन्व्हलपचे भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

या ऐतिहासिक स्वदेशी मार्केटचा पुनर्विकास होणार आहे. या पुनर्विकास प्रक्रियेत स्वदेशी मार्केटच्या कोणत्याही सदस्याला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असे आश्वासन रविंद्र चव्हाण यांनी दिले.



केंद्र सरकारच्या 'मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड' या उपक्रमा अंतर्गत मुंबईतील हे ऐतिहासिक स्वदेशी मार्केट देशभर आणि जगाच्या मार्केटमध्ये पोहचवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करणार असल्याचे रविंद्र चव्हाण म्हणाले. फक्त घोषणांचा पाऊस न पाडता विकासाभिमुख रणनीती वापरून ज्या प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदींजींच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास झाला, असे करणे आधी कुणालाही शक्य झाले नाही. महाराष्ट्रात देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाची गंगा वाहत आहे. त्यामुळे या विकासाच्या प्रवाहात स्वदेशी मार्केटचा देखील पुनर्विकास होणार याबद्दल कोणतेही दुमत नाही असे मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले . या कार्यक्रमामध्ये रविंद्र चव्हाण यांच्या सोबत मंत्री मंगलप्रभात लोढा, स्वदेशी मार्केट संस्थेचे अध्यक्ष सुमित मेहरा, नवी मुंबई प्रदेशाच्या पोस्ट मास्तर जनरल सुचिताताई जोशी, भाजपचे स्थानिक नगरसेवक आकाश राजपुरोहित व रिटा मकवाना उपस्थित होते.

पैशांची हाव संपेना, एक लाखाची लाच मागणारा पोलीस उपनिरीक्षक ताब्यात

■अहिल्यानगर। प्रतिनिधी,

अहिल्यानगर येथे कार्यरत असलेला पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नाशिकमधून ताब्यात घेतले आहे. पदोन्नती मिळून बदली झाल्यानंतरही एक लाख रुपयांच्या लाचेची मागणी करणारा पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हा अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत होता. पदोन्नतीनंतर त्याची अहिल्यानगरमधून नाशिकला बदली झाली. तक्रारदाराचे मामा व इतर १५ आरोपींविरोधात तालुका पोलीस ठाण्यात ११ मे रोजी गुन्हा दाखल झाला आहे. एकाच कुटुंबातील व्यक्तींविरोधात हा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे याच्याकडे होता. या गुन्ह्यांमध्ये मदत करण्यासाठी आणि नातेवाईकांची नावे वगळण्यासाठी गांगुर्डे याने सुरुवातीला २ लाख रुपये लाचेची मागणी केली होती. या विरोधात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. विभागाच्या पथकाने पंचासमक्ष या तक्रारीची पडताळणी केली. शहरातील पोलीस मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ झालेल्या संभाषणादरम्यान गांगुर्डे याने तडजोडीअंती एक लाख रुपये लाच घेण्याचे मान्य केले. लाचेची रक्कम पोलीस मुख्यालय परिसरात स्वीकारण्याचे निश्चित झाले होते. त्याने लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे उघड झाल्याने त्याच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला नाशिकमधून ताब्यात घेऊन नगरला आणण्यात आले.

नात्याला काळिमा! कल्याणमध्ये बापाने लेकीला देखील सोडलं नाही

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण पश्चिमेतील दुधनाका परिसरात वडील आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. वडिलांनी मुलीवर टोकदार शस्त्राने हल्ला करत संपवलं. या संतापजनक घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. संबंधित प्रकरणात मृत मुलीचा गायत्री शिंदे (वय 25) अशी ओळख समोर आली, तर



वडिलांची विनोद वसईकर (वय 50) अशी ओळख समोर आली. या घटनेनं परिसर हादरून गेला. घडलेल्या घटनेनुसार, गायत्री आणि वडील विनोद यांच्यात किरकोळ कारणावरून मोठा वाद झाला होता. हा वाद इतका विकोपाला गेला की, संतप्त झालेल्या वडिलांनी टोकदार हत्याराने गायत्रीच्या कपाळावर सपासप वार केले. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने मदत करण्याचा देखील प्रयत्न केला होता. मात्र, गंभीर दुखापतीमुळे गायत्रीचा दुदैर्वी अंत झाला. या घटनेनंतर आरोपी विनोद वसईकर घटनास्थळावरून फरार झाला. या प्रकरणी बाजारपेठ पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करत पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी दोन पथके पाठवली आहेत. या हत्येमागील नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालं नाही. पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

या घटनेनं कल्याण परिसरात एकच हळहळ व्यक्त करण्यात आली. बापानेच मुलीची हत्या केल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

पिंपरी-चिंचवड हादरले! कपड्यांच्या दुकानात घुसून प्रियकराची प्रेयसीला बेदम मारहाण... आधी लाथा-बुक्क्यांचा मारा, मग धरले पाय

■पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी,

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमधून महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी एक संतापजनक आणि तितकीच धक्कादायक घटना समोर आली आहे. केवळ चारित्र्याच्या संशयावरून एका माथेफिरू तरुणाने आपल्या प्रेयसीला सार्वजनिक ठिकाणी गाठून अत्यंत अमानुषपणे मारहाण केली. एका कपड्यांच्या दुकानात घडलेला हा संपूर्ण प्रकार तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या मारहाणीचा अस्वस्थ करणारा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, अशा प्रवृत्तीच्या तरुणावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

आधी क्रूरतेचा कळस, आणि नंतर...

व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही फुटेजमधील दृश्ये अत्यंत भयानक आहेत. संशयाने पछाडलेला हा तरुण कपड्यांच्या दुकानात प्रवेश करतो आणि काहीही न बोलता थेट तरुणीवर हल्ला करतो. तो तिला दुकानातच ओढत आणून लाथा-बुक्क्यांनी आणि चापटांनी अत्यंत निर्दयीपणे मारहाण करू लागतो. मात्र, या थरारानंतर या घटनेत एक अजब वळण पाहायला मिळाले. तरुणीला बेदम झोडपल्यानंतर या विकृत तरुणाचा राग अचानक शांत झाला. त्याने त्याच दुकानाच्या फरशीवर गुडघे टेकले आणि थेट प्रेयसीचे पाय धरून तिची माफी मागण्यास सुरुवात केली. आधी अमानुष मारहाण आणि नंतर पाया पडण्याच्या त्याच्या या विचित्र वर्तनामुळे नेटीझन्स कमालीचे आश्चर्य व्यक्त करत आहेत.



पोलिसांची धाव, पण पीडित तरुणीचा तक्रार करण्यास नकार

हा भीषण व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून पोलिसांपर्यंत पोहोचताच, पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनाने तत्परता दाखवत तातडीने तपास चक्रावून थेट संबंधित तरुणीला गाठले. पोलिसांनी पीडित तरुणीला धीर देत गुन्ह्याची नोंद करून कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. परंतु, या ठिकाणी पोलिसांनाही धक्का बसला. स्वतःवर इतका मोठा अत्याचार होऊन आणि भरबाजारात मारहाण सहन करूनही, संबंधित तरुणीने आपल्या प्रियकराविरुद्ध कोणतीही पोलीस तक्रार देण्यास स्पष्ट नकार दिला. "हा आमचा खाजगी आणि अंतर्गत वाद आहे," अशी भूमिका घेत तिने कायदेशीर प्रक्रियेपासून लांब राहणे पसंत केले.

नागरिक आणि महिला संघटना आक्रमक

तरुणीने घेतलेल्या या नरमाईच्या भूमिकेमुळे पोलिसांसमोर आता मोठा कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. पीडित व्यक्तीने स्वतः तक्रार देण्यास नकार दिल्यामुळे पुढील पावले कशी टाकावीत, याबाबत पोलीस कायदेशीर सल्ला घेत आहेत. दुसरीकडे, या घटनेचा व्हिडिओ पाहून शहरातील नागरिक आणि विविध महिला संघटना कमालीच्या संतप्त झाल्या आहेत. "आज तक्रार नाही म्हणून अशा गुंडांना सोडून दिले, तर उद्या महिलांवर उघडपणे अत्याचार करण्याचे धाडस वाढेल," अशी भीती व्यक्त करत महिला संघटनांनी संबंधित माथेफिरू तरुणाला पोलिसांनी स्वतःहून (सुओ मोटो) गुन्हा दाखल करून धडा शिकवावा, अशी आग्रही मागणी केली आहे.

कुटुंबातील सगळे घरातच होते, आयपीएस अधिकाऱ्याची मुलगी दुसऱ्या रुममध्ये गेली अन्

■कल्याण। प्रतिनिधी,

अत्यंत उच्चभ्रू मानल्या जाणाऱ्या 'फोर इमली' परिसरात एका 17 वर्षीय मुलीने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची दुदैर्वी घटना घडली आहे. मृत मुलगी ही एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याची कन्या असून, तिने इयत्ता अकरावीची परीक्षा उत्तीर्ण करून बारावीत प्रवेश घेतला होता. ही घटना घडली तेव्हा घरातील कुटुंबीय घरीच उपस्थित होते, परंतु कुणालाही काही समजण्याच्या आतच तिने आपल्या खोलीचा दरवाजा आतून बंद करून गळफास लावून घेतला. मुलीने आत्महत्या का केली, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तिच्या मृत्यूने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलीस तपास आणि संशयाचे सावट

घटनास्थळावरून कोणतीही सुसाईड नोट पोलिसांना सापडलेली नाही, त्यामुळे आत्महत्येचे गूढ अधिकच गडद झाले आहे. हबीबगंज पोलीस ठाण्याचे प्रभारी Sanjeev Chouksey यांनी दिलेल्या



माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत असून, मुलीचा मोबाईल फोन आणि तिच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींची कसून चौकशी केली जात आहे.

शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे कारण होणार स्पष्ट

कुटुंबातील सदस्यांची प्राथमिक चौकशी सुरू असून, त्यातून काही महत्त्वाच्या बाबी समोर येतात का, याकडे पोलिसांचे लक्ष आहे. आयपीएस अधिकाऱ्याचे घर असल्याने या घटनेला अधिक गांभीयार्ने घेतले जात आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण आणि वेळ स्पष्ट होईल, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. तपासाचे सर्व पैलू तपासल्यानंतरच या दुदैर्वी घटनेमागील सत्य समोर येईल. एका तरुण आणि हुशार मुलीने असा निर्णय का घेतला, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे मोठे आव्हान आता पोलिसांसमोर आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस प्रशासनाकडून अत्यंत गोपनीय पद्धतीने केला जात असून, या दुदैर्वी घटनेची नोंद भोपाळमधील हबीबगंज पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ही घटना मध्यप्रदेशातील भोपाळमध्ये घडली आहे.

'त्यांनी मला 50 हजारांना विकल्यानंतर माझ्यासोबत...'

नवऱ्याने विक्री केलेल्या बायकोने काय सांगितलं?

■मुंबई। प्रतिनिधी,

गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील पालनपूरमधून मानवी तस्करी आणि लैंगिक अत्याचाराची एक थरारक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. एका पतीनेच आपल्या काही साथीदारांच्या मदतीने स्वतःच्या पत्नीला केवळ 50 हजार रुपयांना अनोळखी व्यक्तींना विकल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या दुदैर्वी महिलेला आरोपींनी डांबून ठेवून तिच्यावर पाशवी अत्याचार केले, तसेच तिचे दागिनेही जबरदस्तीने काढून घेत ते विकून टाकले. याप्रकरणी पालनपूर पश्चिम पोलिसांनी पीडितेचा पती निकेश पटेल याच्यासह एकूण सात जणांना अटक केली असून संपूर्ण परिसरात या घटनेमुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पोलिसांना का आला संशय?

या भीषण गुन्ह्याचा खुलासा पोलिसांच्या चाणाक्ष तपासामुळे झाला. आरोपी पती निकेश पटेल याने 11 मे रोजी आपली पत्नी पालनपूर शहरातून बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिसांत नोंदवली होती. मात्र, तक्रार दाखल केल्यानंतर अवघ्या दोनच दिवसांत निकेश स्वतः देखील अचानक बेपत्ता झाला. त्यानंतर त्याच्या वडिलांनी पालनपूर पूर्व पोलीस ठाण्यात मुलगा बेपत्ता झाल्याची दुसरी तक्रार दिली. एकापाठोपाठ एक घडलेल्या या दोन संशयास्पद घडामोडींमुळे पोलिसांना संशय आला. पोलीस उपअधीक्षक जिग्नेश गामित यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन तक्रारींमधील गूढ वाढल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि पती-पत्नी दोघांचा शोध घेतला.

पीडितेने सांगितला भयानक प्रसंग

पोलिसांनी शोध घेतल्यानंतर पीडित महिला आणि तिचा पती पोलिसांच्या हाती लागले. जेव्हा पोलिसांनी पीडितेची सखोल चौकशी केली, तेव्हा तिने तिच्यावर बेतलेला भयानक प्रसंग कथन केला. पीडितेने सांगितले की, तिचा पती निकेश याने संजय ठाकोर, अशोक ठाकोर आणि सचिन दरबार या आपल्या साथीदारांच्या संगनमताने तिला पैशांसाठी विकण्याचा कट रचला होता. या टोळीने तिला 50 हजार रुपयांना दुसऱ्या व्यक्तींकडे विकले. या मानवी तस्करीनंतर तिला डांबून ठेवण्यात आले आणि तिच्यावर वारंवार बलात्कार करून लैंगिक छळ करण्यात आला. इतकेच नव्हे तर आरोपींनी तिच्या अंगावरील दागिनेही जबरदस्तीने हिसकावून घेत स्थानिक सराफांना विकले.

मानवी तस्करीचे रॅकेट?

पीडितेच्या या अत्यंत गंभीर जबाबाच्या आधारे पालनपूर पश्चिम पोलिसांनी सामूहिक बलात्कार, मानवी तस्करी, गुन्हेगारी कट रचणे आणि इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करत मुख्य संशयित पतीसह सातही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस तपासात मुख्य आरोपी निकेश पटेल याचा पूर्वेतिहासही गुन्हेगारी स्वरूपाचा असल्याचे समोर आले आहे. तो आधीच विवाहित असतानाही यापूर्वी त्याने अनेक मुलींना आमिष दाखवून त्यांचे अपहरण केल्याचे गुन्हे दाखल आहेत. पोलीस आता या संपूर्ण मानवी तस्करीच्या रॅकेटचा, पीडितेच्या दागिन्यांच्या विक्रीचा आणि या गुन्ह्यात सामील असलेल्या प्रत्येक आरोपीच्या नेमक्या भूमिकेचा सखोल तपास करत आहेत.

मित्रानं कॉफी पाजली अन् सगळं आयुष्य उद्ध्वस्त, यूपीएससी करणाऱ्या तरुणीसोबत काय घडलं?

आरोपींचा एन्काऊंटर करा

ट्रेन बरेली स्थानकाजवळ पोहोचत असताना पीडित तरुणीने फोनवरून वडिलांशी संपर्क साधून आपल्यासोबत घडलेला हा भयानक प्रकार सांगितला. तिच्या वडिलांनी तात्काळ रेल्वे हेल्पलाइनवर संपर्क साधला, ज्यानंतर सरकारी रेल्वे पोलिसांनी ट्रेनमध्येच तिचा शोध घेऊन तिला मदत केली. त्यानंतर तिला दिल्लीतील आनंद विहार पोलिस ठाण्यात नेण्यात आले, जिथे तिच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत 'झिरो एफआयआर' नोंदवण्यात आला. या घटनेमुळे पीडित तरुणी तीव्र धक्क्यात असून, आरोपींना एन्काउंटरमध्ये ठार मारून आपल्याला न्याय मिळावा, अशी मागणी तिच्या वडिलांनी केली आहे. लखनौ पोलिसांनी 'झिरो एफआयआर' प्राप्त झाल्याचे सांगत आरोपींना अटक करण्यासाठी अनेक पथके रवाना केली आहेत.

■कल्याण। प्रतिनिधी,

एका कॉलेजमध्ये शिकणाऱ्या तरुणीला तीन दिवस डांबून ठेवून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. पीडित तरुणी दिल्लीत राहून शिक्षण घेत असून ती केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करत आहे. याप्रकरणी मुख्य संशयित आणि तिच्या ओळखीचा असलेला युवक शिवम यादव, त्याचा मित्र सनी यादव आणि एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयितांनी तरुणीला कॉफीमधून गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले आणि तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे.

व्हॉट्सॲपवर पाठवला मेसेज

मिळालेल्या माहितीनुसार, ही तरुणी सुट्टया घालवण्यासाठी उत्तर प्रदेशातील जौनपूर येथील आपल्या मूळ गावी आली होती. सुट्टया संपवून ती सुहेलदेव एक्सप्रेसने दिल्लीला परत जाण्यासाठी निघाली. ट्रेन सुटल्यानंतर तिने गेल्या चार वर्षांपासून ओळखीचा असलेल्या शिवम यादवला व्हॉट्सॲपवर संदेश पाठवला. ही ट्रेन लखनऊच्या चारबाग स्थानकावर पोहोचताच शिवम आणि त्याचा मित्र सनी यादव तिथे आले. त्यांनी पीडितेची भेट घेऊन तिचे मन वळवले आणि ट्रेनमधून उतरण्यास भाग पाडले आणि एका अपार्टमेंटमध्ये घेऊन गेले.

कॉफी पाजली अन्..

फ्लॅटमध्ये नेऊन शिवमने तरुणीच्या कॉफीमध्ये गुंगीच्या गोळ्या मिसळल्या आणि ती बेशुद्ध झाल्यानंतर तिच्यावर बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ मे रोजी शिवम घरात नसताना सनी यादव याने तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केले. संशयित आरोपी जेव्हा जेव्हा बाहेर जात, तेव्हा फ्लॅटला बाहेरून कुलूप लावून जात असत. पीडितेने पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, 17 मे रोजी त्या फ्लॅटमध्ये तिसरा अज्ञात व्यक्ती आला. या तिघांनी मिळून 18 मेच्या दुपारपर्यंत तिला तिथे डांबून ठेवले आणि तिच्यावर आळीपाळीने सामूहिक बलात्कार केला. त्यानंतर 18 मे रोजी दुपारी त्यांनी पीडितेला पुन्हा चारबाग रेल्वे स्थानकावर नेऊन दिल्लीला जाणाऱ्या सुहेलदेव एक्सप्रेसच्या स्लीपर कोचमध्ये बसवून दिले.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com